बुधवार, 20 जुलै 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 313
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 20 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-313 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### सुटे धान्य, दही, लस्सीवरील जीएसटी मागे



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** १८ जुलैपासून देशातील अनेक खाद्यपदार्थांवर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत डाळ, तांदूळ, दही आणि लस्सी, ब्रँडेड आणि पॅकेबंद खाद्यपदार्थ यासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर तुमच्याकडून जीएसटी आकारला जाईल. दरम्यान, मंगळवारी महत्त्वाची माहिती शेअर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, १४ वस्तू सुटे घेतल्यास त्यावर कर आकारला जाणार नाही. मंगळवारी एका ट्विटमध्ये माहिती देत अर्थमंत्र्यांनी ११ वस्तूंची यादी जोडताना स्पष्ट केले की, जर या यादीत समाविष्ट असलेल्या वस्तू सुटे, अनपॅक किंवा लेबलशिवाय खरेदी केल्या गेल्या असतील तर या वस्तूंना जीएसटीमधून सूट दिली जाईल. या वस्तूंमध्ये डाळी, गहू, राई, ओट्स, मका, तांदूळ, मैदा, रवा, बेसन, दही आणि लस्सी यांचा समावेश करण्यात आला आहे.

# शिवसेनेला दिल्लीतही हादरा!

## संसदेत शिवसेनेचा वेगळा गट, लोकसभा अध्यक्षांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : शिवसेनेच्या १२ खासदारांनी आज आम्हाला समर्थन दिले आहे. त्यांच्या भूमिकेचे मी स्वागत करतो. हिंदुत्ववादी विचारांना आणि युतीचे सरकार स्थापण्याला त्यांनी पाठिंबा दिला. आज १२ खासदारांच्या पाठिंब्यानंतर आम्ही संसदेत शिवसेनेचा वेगळा गट स्थापन करण्यासंदर्भात लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहिले आहे. राहुल शेवाळे गटनेते असतील तर भावना गवळी मुख्य प्रतोद असतील, असे सांगत महाराष्ट्रात बाळासाहेबांच्या विचारांची भूमिका घेऊन शिवसेना-भाजप युती सरकार सत्तेत आले. आता खासदारांच्या भूमिकेने केंद्राचेही पाठबळ मिळेल. ज्या राज्याला केंद्राचा पाठिंबा मिळतो, त्या राज्याचा विकास लवकर होतो, आता महाराष्ट्रात विकासकामांचा धडाका दिसेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.**

एकनाथ शिंदे कालपासून दिल्ली दौऱ्यावर आहेत. सुमारे २० तासांनंतर त्यांनी महाराष्ट्र सदनातून पत्रकार परिषद घेतली. ओबीसी आरक्षण त्याची उद्या सुनावणी आहे. त्यानिमित्ताने वकिलांशी चर्चा सुरु आहे. तसेच १२ खासदारांनी दिलेल्या पाठिंब्यानंतर आम्ही वेगळ्या गटाच्या विचारासंबंधी लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहिल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

**१२ खासदारांच्या भूमिकेचे स्वागत**

१२ खासदारांच्या समर्थनानंतर संसदेतील शिवसेनेचे कार्यालय ताब्यात घेण्याच्या हालचाली एकनाथ शिंदे यांनी सुरु केल्या आहेत. शिंदे गटाने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना एक पत्र लिहिलंय. यामध्ये आमच्याकडे दोन तृतीयांशपेक्षा अधिक बहुमत असल्याचं सांगत शिंदे गटाने संसदेतील सेना कार्यालयावर दावा सांगितलेला आहे.

**उद्धव ठाकरे यांच्या सांगण्यानुसारच आम्ही वेगळा**



**निर्णय घेतला : राहुल शेवाळे**

उद्धव ठाकरेंनी सांगितले की भाजपशी युती करण्याचा मी देखील प्रयत्न करतो, तुम्ही तुमच्या सोर्सने प्रयत्न करा, प्रयत्न सुरु ठेवा. म्हणून मग आमचे सोर्स एकनाथ शिंदे आहेत, उद्धव ठाकरेंच्या सांगण्यानुसार आम्ही १२ खासदारांनी वेगळी भूमिका घेतली. अरविंद सावंत यांनी राजीनामा देताना फक्त मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता, एनडीएचे समर्थन काढले, असे कोणतेही पत्र दिलेले नव्हता, इथून पुढे आमचे समर्थन एनडीएला असेल.

### संजय राऊत दखल घेण्यासारखे नाहीत : शिंदे

शिवसेनेच्या १२ खासदारांवर तपास यंत्रणाचा दबाव आहे. त्याचमुळे संबंधित खासदारांनी एकनाथ शिंदे गटाला पाठिंबा दिला आहे, असा आरोप शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला होता. याबाबत बोलत असताना एकनाथ शिंदे यांनी सणसणीत टोला लगावला. दुसरे कोण बोलले असते तर मी बोललो असतो. पण संजय राऊत काही दखल घेण्यासारखे नाहीत, असे एकनाथ शिंदे म्हणाले. तसेच संजय राऊत रोज सकाळी मॅटिनी शो घेतात. त्यांचे बोलण्याला काय महत्व द्यायये?, असेही ते म्हणाले.

## चर्चेतली बातमी

### खाण माफियांनी डीएसपींवर थेट डंपर चढवला



आधुनिक केसरी न्यूज

**चंदीगढ :** हरियाणात एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. येथील नूह भागात खाण माफियांनी डीएसपींवर थेट डंपर चढवला ज्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. डीएसपी सुरेंद्र सिंह विश्नोई यांचा या घटनेत मृत्यू झाला आहे. पाचगावजवळ ही घटना घडली. डीएसपी सुरेंद्र सिंह विश्नोई हे याच वर्षी निवृत्त होणार होते. मिळालेल्या माहितीनुसार, डीएसपी सुरेंद्र सिंह विश्नोई हे तवाडूमध्ये तैनात होते. त्यांना अवैध उत्खनन होत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर ते तिथे चौकशीसाठी गेले. तिथे त्यांनी दगडाने भरलेला ट्रक थांबवण्याचा प्रयत्न केला. पण, त्यांना डंपरने चिरडले, त्यात त्यांचा मृत्यू झाला. अपघात अपघाताबाबत नूह पोलिसांनी सांगितले की आरोपींचा शोध सुरू असून त्यांना लवकरच पकडण्यात येईल. घटनेनंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. डीएसपींच्या हत्येची माहिती मिळताच पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.

# माझ्या भात्यातील कितीही बाण घेऊन पळा

## धनुष्य माझ्याकडे आहे हे लक्षात ठेवा, उद्धव यांचे भाजपवर 'ठाकरी' बाण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेनेत फूट ही बंडखोरांनी पाडली नाही तर भाजपने पाडली आहे. भाजपच सेनेला संपवत आहे, असा हल्लाबोल करत माझ्या भात्यातील कितीही बाण घेऊन पळा, धनुष्य माझ्याकडे आहे हे लक्षात ठेवा, असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ठणकावून सांगितले. ठाकरे संकटाला घाबरत नाहीत. कितीही संकटे आली तरी संघर्ष करु, पुन्हा पक्ष नव्याने उभा करु, असा निर्धार उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

उत्तर भारतीय महासंघाच्या मुंबईतील पदाधिकाऱ्यांनी आज शिवसेना भवन येथे जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेसोबत असल्याची भावना व्यक्त केली. सध्या शिवसेनेचा कठीण काळ सुरु



आहे. भगव्याचे निष्ठावंत शिलेदार एक एक करुन तुमची साथ सोडत आहेत. पण या संकटाच्या काळात उत्तर भारतीय महासंघाचे आम्ही पदाधिकारी तुमच्यासोबत आहोत, अशी ग्वाही त्यांनी उद्धव ठाकरे यांना दिली.

उत्तर भारतीय महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीला संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी ठाकरी भाषेत भाजप आणि शिंदे गटावर बाण सोडले. ते म्हणाले, माझ्या भात्यातील कितीही बाण घेऊन पळा, पण धनुष्य माझ्याकडे आहे हे लक्षात ठेवा. शिवसेनेत फूट बंडखोरांनी पाडली नाही तर ती भाजपने पाडली. भाजपच सेनेला संपवत आहे. भाजप दोन कोंबड्यामध्ये झुंज लावत आहे. एक मेला की दुसऱ्याला जेलमध्ये टाकायचे, हा भाजपचा अनेक दिवसांपासूनचा डाव आहे. पण आम्ही ठाकरे आहोत. कितीही संकटे आली तरी संघर्ष करायचा हा आमचा पिंड आहे. संघर्षाला ठाकरे घाबरत नाहीत. हे ही दिवस जातील, तोपर्यंत मैदानात उतरु पुन्हा पक्ष नव्याने बांधू, शिवसेना पुन्हा उभी करु, असा प्रण उद्धव ठाकरे यांनी केला.

# आरबीआयकडून दोन बँकांवर निर्बंध, महाराष्ट्रातील बँकेचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकेने दोन सहकारी बँकांवर निर्बंध लादले आहेत. या दोन्ही बँकेतील खातेधारक आता आपल्या खात्यातून पैसे काढू शकणार नाहीत किंवा कोणताही व्यवहार करता येणार नाही. रिझर्व्ह बँकेकडून कारवाई करण्यात आलेल्या या दोन बँकांमध्ये कर्नाटकस्थित श्री मल्लिकार्जुन पट्टण सहकारी बँक लिमिटेड आणि महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा गिरणा सहकारी बँकेचा समावेश आहे. दोन्ही बँकांची आर्थिक स्थिती अस्थिर असल्याचे आरबीआयच्या निदर्शनास आल्याने हे पाऊल उचलण्यात आले आहे. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार श्री मल्लिकार्जुन पट्टण सहकारी बँक आणि नाशिक जिल्हा गिरणा सहकारी बँकेच्या ग्राहकांना पुढील सहा महिने त्यांच्या खात्यातून पैसे काढता येणार नाहीत. या दोन्ही बँकांवर रिझर्व्ह बँकेने सहा महिन्यांची बंदी घातली आहे. रिझर्व्ह बँकेने यासंदर्भात निर्देश जारी केले आहेत. दोन्ही बँकांवरील बंदी पुढील सहा महिने कायम राहणार आहे. यामध्ये एक सहकारी बँक कर्नाटकातील तर दुसरी महाराष्ट्रातील आहे. मात्र, या बँकांच्या ग्राहकांसाठी चांगली गोष्ट म्हणजे त्यांच्या ठेवी सुरक्षित आहेत. नाशिक जिल्हा गिरणा सहकारी बँकेच्या ९९.८७ टक्के ग्राहकांच्या ठेवींचा विमा उतरवल्याचे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. त्यामुळे या ग्राहकांची ५ लाखांपर्यंतची रक्कम विमा हमी कायद्यांतर्गत परत केली जाईल.

# तुम्ही वीर बनू शकता, अग्निवीर नाही

## सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने वकिलांची घेतली फिरकी

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : अग्निपथ योजनेसंबंधी सर्वोच्च न्यायलयात सुनावणी घेण्यात आली. अग्निपथ योजनेला आव्हान देणारी याचिका न्यायलयात दाखल करण्यात आली आहे. या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांनी वकील शर्मा यांची चांगलीच फिरकी घेतली. या फिरकीनंतर न्यायलयात एकच हसा पिकला होता.


शर्मा यांनी केलेल्या उत्कट युक्तिवादानंतर सर्वाच्च न्यायलयाचे न्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी तुम्ही वीर बनू शकता, अग्निवीर नाही असे म्हणत आपल्या मजेशीर अंदाजात शर्मा यांची फिरकी घेतली. विशेष म्हणजे शर्मा हे विविध मुद्द्यांवर जनहित याचिका दाखल करण्यासाठी ओळखले जातात. न्यायमूर्ती चंद्रचूड यांची फिरकी माझ्या मेहनतीचे आणि प्रयत्नांचे कौतुक करणारी असल्याचे मत शर्मा यांनी एनडीटीव्हीशी बोलताना व्यक्त केले आहे. शर्मा यांनी अग्निपथ योजनेच्या विरोधात पहिली याचिका



दाखल केली होती. दिल्ली उच्च न्यायालयासोबत इतर न्यायालयातही सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने अग्निपथ भरती योजनेला आव्हान देणाऱ्या तीन याचिका दिल्ली उच्च न्यायालयात हस्तांतरित करण्याचे निर्देश दिले आहे. न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, सूर्यकांत आणि ए एस बोपण्णा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. केरळ, दिल्ली, पंजाब आणि हरियाणा, पाटणा आणि उत्तराखंड या उच्च न्यायालयांत सुद्धा अग्निपथ विरोधातील याचिकांची सुनावणी सुरू आहे. तसेच कोचीच्या सशस्त्र सेना न्याय प्राधिकरणासमोरही या प्रकरणी सुनावणी सुरू आहे. त्यामुळे ही याचिका स्वीकारणे योग्य होणार नाही, असे सर्वोच्च न्याायलायाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने केरळ, पंजाब, हरियाणा, पाटणा आणि उत्तराखंडच्या येथील उच्च न्यायालयात दाखल दाखल याचिका दिल्ली उच्च न्यायालयाकडे हस्तांतरित करण्याची परवानगी याचिकाकरर्त्यांना द्यावी, असे निर्देश न्यायालयांने दिले. तत्पूर्वी, दिल्ली उच्च न्यायालयासमोर याबाबतच्या अनेक याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. आमच्या मते या तीन याचिका सुद्धा दिल्ली उच्च न्यायालयाकडे हस्तांतरित केल्या जाव्यात, अशी विनंती सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केली होती. ही मागणी सर्वोच्च न्यायालयाने मान्य करत या याचिका दिल्ली उच्च न्यायालयात हस्तांतर करण्याचे निर्देश दिले. यासोबतच दिल्ली उच्च न्यायालयात दाखल याचिका शक्य तेवढ्या लवकर निकाली काढाव्या, असे आदेशही न्यायालयांना दिले. तसेच अग्निपथ योजनेला आव्हान देणारी कोणतीही याचिका सर्वोच्च न्यायालयात स्वीकारली जाणार नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# एक सोहळा : आगळावेगळा...

आधुनिक केसरी

ही गोष्ट तेराव्या शतकातली आणि आज आपण आहोत एकविसाव्या शतकात. काळाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. समाजात अनेक वाईट प्रथा काळाच्या ओघात निर्माण झाल्या. माणूस महत्वाचा राहिला नाही.

जात, भाषा, धर्म, पंथ इ सारखे भेद माणसाला माणसापासून तोडू लागले. ज्ञानेश्वर माउली पासून अनेक संतांनी समाजप्रबोधन केले. अनेक समाजसुधारकांच्या पिढ्या यात खर्ची पडल्या.

पण समाजमन हळूहळू बदलते आहे. जातीपातींची बंधने काहीशी सैल होताहेत. २८ मे रोजी पुण्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध अभिनेते शरद पोंक्षे यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. या वेळी बोलताना त्यांनी ब्राह्मणेतर समाजातील काही मुलांच्या नुकत्याच झालेल्या उपनयन विधीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. स्वा सावरकरांना देखील अशाच प्रकारचे बदल समाजात अपेक्षित होते असे प्रतिपादन त्यांनी केले. आणखी एक उदाहरण आपल्यासमोर मांडतो. १७ एप्रिल २०१६ रोजी औरंगाबाद येथे ३० मुली आणि सात मुलांवर उपनयन संस्कार करण्यात आला. महाराष्ट्राच्या इतिहासात शेकडो वर्षानंतर प्रथमच मुलींवर उपनयन संस्कार करण्यात आल्याचे हे उदाहरण असावे. आश्चर्याची आणि समस्त महिला वर्गाच्या दृष्टीने अभिमानाची ठरावी अशी आणखी एक गोष्ट घडली. या उपनयन सोहळ्याचे पौरोहित्य एका महिला विदुषीने केले. त्यांचे नाव आचार्या नंदिता शास्त्री चतुर्वेदी. या सोहळ्यासाठी त्या खास वाराणसी येथून आल्या होत्या. मुलींना उपनयन संस्कारांचा अधिकार आहे याचे दाखले प्रत्येक वेदात आढळून येतात असे प्रतिपादन त्यांनी केले. नंदिता शास्त्री या वाराणसी येथील वेद विद्यालयाच्या प्रमुख अध्यापिका असून त्यांना चारही वेद मुखोद्गत आहेत.आपल्या हिंदू संस्कृतीतील सोळा संस्कारातील हा अत्यंत महत्वाचा संस्कार आहे. प्रत्येक व्यक्तीवर आपल्या मातापित्यांचे, गुरूंचे आणि समाजाचे ऋण असते. उपनयन संस्कारानंतर प्रत्येक व्यक्तीला माता-पिता, गुरु आणि समाज ऋण फेडण्याचा अधिकार प्राप्त होतो असे समजण्यात येते.



## आनंदी पहाट

# तणाव आणि दुःखाची पातळी वाढू देऊ नये

आधुनिक केसरी

मानसिक तणाव किंवा चिंता नसलेली व्यक्ती सापडणे सध्याच्या दिवसांत कठीणच आहे. मनःशांती म्हणजे मानसिक युद्ध, कायदा आणि सुव्यवस्था, सुसंवाद किंवा शांत आणि शांतता यापासून स्वातंत्र्य प्राप्त करणे होय. मनःशांतीचे उदाहरण म्हणजे आपल्या दोन मनांनी करार घोषित करणे होय. दोन व्यक्ती एकत्र आल्यावर देखील काहीवेळा अशांतता निर्माण होत असते. दोन्ही अभिव्यक्ती बरोबर असल्यामुळे, त्यांचा प्रत्येक गोष्टीचा, घडामोडीचा आणि घटनेचा अर्थ पूर्णपणे भिन्नपणे काढला जातो. मनःशांती हा वाक्यांश चिंतेपासून मुक्त असताना आपण आनंद घेत असलेल्या शांतता किंवा संरक्षणाच्या मानसिक स्थितीचे वर्णन करतो. याउलट, मनाचा एक भाग हे दोन अभिव्यक्तींचे दोषपूर्ण संयोजन आहे आणि ते कधीही वापरले जाऊ नये, ह्याची जाणीव ठेवणे आवशयक असते. मनःशांती ही मानसिक आणि भावनिक शांततेची स्थिती असते, जी आपण जोपासायला शिकू शकलो पाहिजे. या अवस्थेत आपल्याला शांतता, आनंद आणि स्वातंत्र्याची अनुभूती येते. ही मानसिक स्थिती आपल्याला आपल्या विचारांवर अधिक नियंत्रण ठेवण्यास सक्षम करते. नकारात्मक, त्रासदायक किंवा नको असलेले विचार नाकारणे अशावेळी अधिक सोपे असते. शांत राहण्याची स्थिती, शांतता, शांत स्वभाव हे सर्वच प्रत्यक्षात सहज साध्य करता येत नाही. परंतू जे तणावग्रस्त किंवा दुःखी आहेत त्यांच्या अधिक संपर्कात राहून स्वतःला त्यांच्यामध्ये समरस केल्याने आपली तणाव आणि दुःखाची पातळी वाढू शकते, हे लक्षात घेणे आवश्यक असते. दैनंदिन जीवनातील तणाव कमी करण्याचा मनःशांती हा एक उत्तम मार्ग आहे आणि आपल्याला एकंदरीत शांत, अधिक आरामशीर व्यक्ती बनण्यास ते मदत करू शकते. यामुळे आपण आनंदी जीवन जगू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## बोलणे संतांचे । टाळु नये ।।

होऊनी सावध । वागावे संसारी ।।
फुकाची चाकरी । करू नये ।। १ ।।

मुखी हरिनाम । पायी दिंडी वारी ।।
परमार्थ विकारी । करू नये ।। २ ।।

जगणे मरणे । काळाचे आधीन ।।
सात्विक जीवन । टाळू नये ।। ३ ।।

सुख दुःख दोन्ही । जाणावे समान ।।
अंगास लिंपन । लागू नये ।। ४ ।।

संसार परमार्थ । मुळ जगण्याचे ।।
बोलणे संतांचे । टाळु नये ।। ५ ।।



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**केनापि हि शूरेण पादाक्रान्तं महीतलम्।**
**क्रियते भास्करेणेव स्फारस्फुरिततेजसा ।।**

**अर्थ :** जसे एकच सूर्य आपल्या विस्तीर्ण तेजाने, तसे एकच पराक्रमी मनुष्य आपल्या पराक्रमाने या समस्त महीतलास म्हणजे पृथ्वीस पादाक्रांत करतो. पराक्रमी मनुष्याचे महत्व या श्लोकात भर्तृहरींनी सांगीतले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## दासबोध ग्रंथ का वाचावा



आधुनिक केसरी

**ग्रंथराज मुगुटमणि तोची ऐक दासबोध।**
**दासबोध ग्रंथ वाचता मिळे बाळबोध ज्ञान,**
**विज्ञान, परमार्थ रुपी भांडार असे तो ऐक ग्रंथराज।।**

दासबोध ग्रंथ का वाचावा असे जर कुणाच्या मनात आले तर मी म्हणेन की हा अध्यात्मिक ग्रंथ आहे. सकल भूमंडळात प्राणी मात्रांच्या सर्व आशा, आकांक्षा पूर्ण करण्यासाठी असणारे सामर्थ्य या ग्रंथात आहे. दासबोधाची शिकवण जीवनातील नैराश्य घालवून चैतन्य ऊत्पन्न करणारा हा राजाधिराज ग्रंथ लिहिला आहे. बोध व प्रबोध यातील बोध म्हणजे आपल्याला मिळालेले ज्ञान व प्रबोध म्हणजे माझ्या जवळ जे ज्ञान आहे ते अध्यात्मिक ज्ञान दुसऱ्यास देणे होय, असा हा विमलज्ञान असलेला ग्रंथ राज आहे. तो ऐक वरद विनायकाचा वरदहस्त लाभलेला समर्थाचा दास भांडार आहे विवेकाची खाण,आणि ओजस्वी ज्ञान आहे.

**गणेशस्तवन**

दर्शन मात्रे मन कामनापूर्ती अशा सर्व सिध्दिचे फळ देणार्या विघ्नहर्ता गणेशाला वंदन करूनत्याने अंतःकरणात कायमस्वरूपी रहावे अशी प्रार्थना व कोटी कोटी नमस्कार

गणपती हा सर्व सिध्दिचे फळ देणार आहे. त्याच्या नुसत्या दर्शनाने माणसाच्या सर्व कामना पुर्ण होतात.तो ब्रम्ह आहे, साक्षात आहे, मुलाधार आहे. ज्याचे गुण गाण्यात माझी अल्पस्वल्प मती कमी पडते. अशा सर्व विद्याच्या स्वामीला माझा नमस्कार असो.

**शारदास्तवन**

शारदा ही ब्रम्हादिकांची आई आहे. आपण लहानपणी आईचे बोट धरून प्रथम शाळेच्या म्हणजे शारदेच्याच प्रांगणात पाऊल ठेवतो. खरे तर ईथेच आपली शारदेची प्रथम ओळख होते. संपूर्ण आयुष्य खर्ची घातले तरी शारदा आपल्याला कळत नाही. कारण ती खुप महनीय आहे. ती वेदांची आई आहे. प्रत्यक्ष ब्रम्हा, विष्णु, महेश तिच्या पोटी जन्म घेतात.आदिपुरूष ईश्वराची ती भार्या आहे. सहा शास्त्रे, अठरा पुराणे, वेद,श्रुती हे सर्व ग्रंथ शारदेचीच स्तुती करतात. ती प्रसन्न व्हावी म्हणून तिची काया ,वाचा,मनाने भक्त प्रार्थना करतात. ती योग्याना ध्यान लावण्यासाठी मदत करते,साधकाला आत्मकलेची ,आत्मचिंतनाची कला शिकवते,समाधी रूपाने स्थिर होणारी सिध्द पुरूषांच्या रूपात ती असते आणि तिलाच आपण शारदा असे संबोधतो. सर्व प्रकारच्या कला,विद्या,सिध्दि आणि चिरकाल शाश्वत बुध्दी रूपी ज्ञान म्हणजे शारदेचाच विलास असतो.पण घमेंडी,अहंकारी, द्वेशबुध्धी,रागीट, भांडखोर अशा समाजातील हीन प्रकारच्या लोकांबरोबर ती राहू शकत नाही. म्हणून अध्यात्म विद्यापीठात शारदेच्या पूजेला अनन्य महत्त्व आहे. हे समजण्यासाठी तरी प्रत्येक व्यक्ती ने दासबोधाचा अभ्यास करावा. 'विद्या विनयेन् शोभते' अशा थोराहून थोर शारदेस माझा भावभक्तिचा नमस्कार

# साधनाची चार अंगे

आधुनिक केसरी

मी जेव्हा भजन करीत असे, त्या वेळेस मी आणि देव यांच्याशिवाय मला कुणीच दिसत नसे. तसे तुम्हाला व्हावे अशी माझी इच्छा आहे, आणि तसे तुम्हाला होऊ शकेल म्हणूनच हे मी तुम्हाला सांगतो आहे. प्रपंचात वागत असताना प्रत्येकाने अंतर्मुख होऊन आपले दोष काय आहेत ते हुडकून काढावे आणि ते घालविण्याचा प्रयत्न करावा. माझे अवगुण मला डोंगरासारखे दिसले पाहिजेत.

प्रत्येकजण स्वतःच्या अवगुणांकडे दुर्लक्ष करून, दुसर्याच्या अवगुणांकडे किंवा दोषाकडे पाहतो. त्याला स्वतःच्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही, पण दुसर्याच्या डोळ्यातले कुसळसुद्धा मुसळापेक्षा जास्त मोठे दिसते, हेच चुकते. आपण दुसर्याचे दोष सांगू नयेत, आणि परनिंदा करू नये.

रोज निजण्याच्या वेळेस, आपण दिवसभरात देवप्राप्तीसाठी काय केले आणि दुसऱ्याच्या निंदेत किती काळ घालवला याचा पाढा वाचावा, म्हणजे चित्तशुद्धी होत जाईल. रोज असे तुम्ही करीत जा,म्हणजे तीन महिन्यात तुमचे चित्त शुद्ध होईल.

चित्तशुद्ध होण्यासाठी दुसरा उपाय म्हणजे सत्संग. सत्संग करण्यासाठी संत कुठे पाहावेत ? आपण पाहू गेलो तर संत आपल्याला ओळखता येतील का ? संत आपल्यासारखेच देहधारी असतात का ? हल्लीच्या काळात संत पाहू गेल्यास सापडणे कठीण आहे. अशा वेळी दासबोध हाच संत होईल. समर्थांनी सांगून ठेवले आहे की, जो विश्वासाने हा ग्रंथ वाचील त्याला माझा संग घडेल. आपण संतांना देहात पाहू नये, तर ते जे साधन सांगतात, तेच ते होत असे समजावे.



त्यांनी चार गोष्टी करायला सांगितल्या आहेत :

एक, निर्गुणत्व कळायला कठीण म्हणून सगुणोपासना करावी. त्यानेच निर्गुणरहस्य कळेल. दुसरी गोष्ट म्हणजे नम्रता. अभिमानाने परमात्मा दुरावतो. सर्वांशी जो नम्र तो भगवंताला प्रिय असतो. तिसरी गोष्ट अन्नदान, कलियुगात यथाशक्ति अन्नदान करीत जावे. त्याचे महत्त्व फार आहे. चौथी गोष्ट म्हणजे भगवन्नामस्मरण अखंड ठेवणे. परमात्मप्राप्तीसाठी संतांनी नाम ही अजब वस्तू दिली आहे.

संत भेटल्यावर, काही करायचे उरले आहे असे आपल्याला वाटताच कामा नये. ज्यांना ते वाटते, त्यांना गुरू भेटूनही भेट न झाल्यासारखेच आहे. आज एक यात्रा केली, उद्या दुसरी करायची राहिली, अशी इच्छा का असावी ? गुरू एकदा भेटला की आता काही कर्तव्यच उरले नाही असे ज्याला वाटते, त्यानेच गुरू भेटल्याचे सार्थक केले असे होते. गुरुआज्ञेपरते दुसरे त्याला साधनच नसते. तोच परमार्थ, आणि तीच त्याची तीर्थयात्रा होते. आणखी काही करायचे आहे असे त्याच्या ध्यानीमनीही येत नाही. अत्यंत चिकाटीने संतांचा समागम करावा, आणि त्यांच्या कृपेस पात्र व्हावे.

# सीईओ साहेब बीड जि.प.अंतर्गत शाळेवर न जाताही वेतन दिले जातेय म्हणे..!

## शिक्षक ज्ञानदेव वाघमारे सह कर्मचारी-अधिकाऱ्यांची मज्जा; परंतु सरकारी तिजोरीचा-धोरणांचा फज्जा उडाला त्याचे काय?

आधुनिक केसरी न्यूज



**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** सीईओ अजित पवार बीड जि.प.अंतर्गत येणाऱ्या शाळांमध्ये जिल्ह्यात अनेक शिक्षकांनी दिलेल्या शाळेवर रुजू न होता लाखो-करोडोचे वेतन उचलून शासनाच्या तिजोरीवर एक प्रकारे डल्लाच मारला असून असा सरकारी पैशावर अनधिकृत हल्ला होत असताना त्याचा बोलबाला होत नाही एक नवलच..!

साहेब तुमच्यासारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या काळात जर एवढा मोठा प्रकार दडून राहत असेल तर तुमच्या अगोदरच्या काळातील अधिकाऱ्यांच्या काळात किती मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार केला-झाला असेल याची कल्पनाही करवत नाही. परंतु नवल एकच आहे की, आपल्या कानावर अलीकडच्या काळात बी.एम. न्यूज चॅनल व दै.आधुनिक केसरीच्या माध्यमातून हा सारा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आणून प्रकर्षाने आपल्या लक्षात आणून देऊनही संबंधितावर कारवाई होण्यास विलंब का....?? नेमके यामागे काय गौडबंगाल समजावे काही कळायलाच मार्ग नाही. जर यामागे खरच काही नसेल आणि आपली ज्याप्रमाणे ख्याती आहे तसे आपण इतंभूत असाल तर मग अनेक जण निलंबनाच्या मार्गावर आहेत, तर अनेकांवर गुन्हे दाखल होण्याईतपत गंभीर आरोप-प्रत्यारोप असूनही अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय घेतला जात नाही हे का....? आणि कशासाठी.....?? हे एकदा बीड जिल्हावाशियांना कळू द्या.....!

**अंबाजोगाई येथील डी.एस.वाघमारे नामक शिक्षकास पाठीशी घालणाऱ्यांवर आपण तात्काळ कारवाई करणार का?**

सीईओ साहेब अंबाजोगाई येथील ज्ञानदेव संतराम वाघमारे (डी.एस.) नामक शिक्षकास या ना त्या कारणाने आपल्यासारख्या आय.ए.एस. (IAS) अधिकाऱ्याने समुपदेशनाने रुजू होण्यासाठी आदेश दिलेले असतानाही हा मुजोर शिक्षक संबंधित दिलेल्या शाळेवर रुजू होत नाही आणि वरतून त्या संबंधित कालावधीतील पगार त्याला मिळतो यावरून असे सिद्ध होते की आपण मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) असलेल्या बीड जि.प.मध्ये शाळेवर न जाता ही पगार मिळतो म्हणजे ती एक प्रकारे अशा कामचुकारांसाठी मज्जाच आहे. मग अशा पद्धतीने जर शासनाच्या तिजोरीचा-धोरणांचा फज्जा उडवला जात असेल आणि दिवसाढवळ्या यात अशा फसवणूक करणाऱ्या शिक्षकास दिवसाढवळ्या मदत केली जात असेल,




तर अशा संबंधित कर्मचारी-अधिकाऱ्यांवरती आपण तात्काळ गुन्हे दाखल का करत नाहीत....? अशी शंका उद्‌भवल्याने जिल्हाभरात या अनुषंगाने आपल्या बाबतीतही उलट-सुलट चर्चेला चांगलेच उधान आले आणि येत आहे. जर का हे आपणास ठाऊक नसेल, आपली दिशाभूल करून या प्रकरणाचा छडा लावला असेल तर आपण तात्काळ संबंधितांवर निलंबनाची कारवाई करत सर्वांवरती गुन्हे दाखल करणार का....?? हा प्रश्न आपणास जिल्हाभरातून मोठ्या अपेक्षेने विचारला जात आहे.

**डी.एस.वाघमारे यांच्या प्रतापांची कहाणी भ्रष्टाचाराची छावणी**

संबंधित शिक्षक महाशय हे ज्या जि.प.प्रा.शा शिवाचा तांडा रविवार पेठ, आंबेजोगाई येथे काम करत होते. ती शाळा दि. 12/7/2017 रोजी बंद करण्यात आली. ती बंद झाल्यानंतर जि.प.बीडने लागलीच दि. 13/7/2017 रोजी समायोजनासाठी बीड येथे उपस्थित राहणे बाबत वाघमारे यांना पत्र दिले आणि मग समायोजनात या शिक्षकाला 24/1/2018 रोजी जि.प.प्रा.शा शिवाजीनगर दिंद्रुड, केंद्र कन्या दिंद्रुड ता. माजलगाव येथे पदस्थापना मिळाली. परंतु हे शिक्षक महाशय येथे रुजू झालेच नसल्याची खात्रीशीर माहिती नाव न छापण्याच्या अटीवर सुत्रांकडून मिळाली. एवढेच नव्हे तर आपणास असा कुठलाच आदेश मिळाला नसल्याचे संबंधित महोदयांनी जि.प. शिक्षण विभाग आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालय आंबेजोगाई यांना सांगून ते बाहेर बिनधास्त फिरत राहिले. आणि वरतून शिक्षण विभागच्याच विरोधात हायकोर्टत 9224/ 2017 क्रमांकाने चक्क याचिका दाखल केली. त्यामुळे मग तत्कालीन सीईओ यांनी वाघमारे यांना आपण हायकोर्टातील याचिका संबंधित व दिलेल्या शाळेवर हजर न झाल्याबाबत खुलासा मागितला. तसेच दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता विनाकारण विलंब लावल्यामुळे आपला हा काळ NO WORK NO PAY मधे ग्राह्य धरून सेवाखंड का धरण्यात येऊ नये....? व अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी अनधिकृत गैरहजरी म्हणून का समजण्यात येऊ नये....??याबाबतचाही सदरील नोटीस मिळाल्यापासून पाच (५) दिवसाच्या आत खुलासा करण्याचे आदेश दिले होते. पण अंगातील मगरुरपणा खरेपणाला बाहेर येऊच देत नसल्याने अपेक्षित काहीच हाती लागले नाही.

**डी.एस.वाघमारे शिक्षकाचे धोरण दोन तोंडी मांडुळासारखे?**

या शिक्षकाने दि.10/4/2018 रोजी शिवाजीनगर केंद्र कन्या दिंद्रुड, ता. माजलगाव या शाळेवर हजर न झाल्याचा खुलासा दिल्याची माहिती असून वरील येथे रुजू होण्यासाठीचा आदेश मला मिळाला असल्याचे लिहून दिले असून परत हेच महाशय बीड जि.प. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना खोटे बोलून हा आदेशच मला मिळाला नाही अशी पलटी घेऊन अहवाल देतो. यावरून संबंधित महाशय हे शिक्षण विभागाचे किती आणि कशी दिशाभूल करत आले आहेत. हे स्पष्ट दिसून येत आहे. आणि यावरून त्यांचे धोरण दोन तोंडी मांडूळासारखे असल्याची चर्चा अंबाजोगाई येथील गटशिक्षण कार्यालय परिसरात आणि बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभाग परिसरात अनेकाकडून ऐकावयास मिळते आहे.

**बदलीसाठी बोगस युडायस कोड वापरून पोर्टलला माहिती भरल्यामुळे डी.एस.वाघमारेला निलंबित करण्यात आले होते**

या वाघमारे नामक महोदयांनी केवळ अधिकाऱ्यांची दिशाभूल केली नाही, तर जि.प. शिक्षकांच्या ऑनलाइन बदली प्रक्रिया सुरू झाल्यानंतर त्यांनी बदली प्रक्रियेसाठी बंद झालेल्या शाळेचा युडायस कोड वापरून बदली पोर्टलला खोटी माहिती भरली. पती-पत्नीचे नौकरीचे अंतर 32 कि.मी. दाखवून बदली करून घेतली. परंतु ते जास्त काळ टिकले नाही.



वाघमारे यांनी बदली प्रक्रियेत चुकीची माहिती भरून जि.प.प्रा.शा सह्याद्रीनगर, शेपवाडी केंद्र रविवार पेठ, आंबेजोगाई येथे पदस्थापना मिळवली आहे. हे कळताच शिक्षकांनी त्याविरुद्ध आक्षेप नोंदवल्यामुळे चौकशीअंती ज्ञानेश्वर वाघमारे यांचा हा किळसवाणा खोटारडेपणा उघडा पडल्याने तत्कालीन सीईओ यांनी त्यांना निलंबित केले होते.

**सीईओ साहेब वाघमारे यांनी शाळेवर न जाता शासनाची फसवणूक करून लाखोंचे बोगस वेतन उचलेले असल्याने त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा**

सीईओ अजित पवार साहेब जि.प.प्रा.शा शिवाचातांडा, केंद्र रविवार पेठ, अंबाजोगाई ही शाळा बंद झाल्यानंतर डी.एस. वाघमारे हे शिक्षक महोदय कुठेच हजर झाले नाहीत. यानंतर त्यांनी काही महिन्यांचा कालावधी गेल्यानंतर आपला बदली आदेश चिचखंडी केंद्र भावठाणा येथे करून घेतला आणि रुजु झाले. परंतु कुठेही रुजू न झालेला आणि शाळा बंद झाल्यापासून ते पोर्टलला चुकीची माहिती भरून करून घेतलेल्या शिक्षक बदलीनुसारच्या पदस्थापनेपर्यंतचा कालावधी हा दहा-अकरा (१०-११) महिन्यांचा असून या काळात हे महाशय कुठेही उपस्थित नसताना त्यांनी पुन्हा एकदा शिक्षण विभागाची तथा शासनाची फसवणूक करून या काळाचे वेतन उचलले आहे.तेंव्हा अशा फसव्या-लबाड शिक्षकाकडून भविष्यातील कोणती पिढी घडवण्याचे काम आपणास आणि शिक्षण विभागास अपेक्षित आहे. हे ही एकदा बीड जिल्हा वाशीयांना कळू द्या ! सीईओ साहेब अशा शिक्षकांमुळे उद्या हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येणार असेल आणि असंख्य पिढ्यांची बरबादी होणार असेल तर विचाराने आणि वर्तणुकीने पात्र नसणाऱ्या शिक्षकास अपात्र ठरवत आपण कठोर दंडात्मक कारवाई करावी आणि शासनाची झालेली लूट ही त्यास मिळणाऱ्या विविध लाभ-देयकांमधून वसूल करून घेण्यात यावी. अशी मागणी आता चांगला जोर धरू लागली असल्याने आपण कधी आणि नेमकी काय कारवाई करणार याकडेच आता चांगल्या शिक्षकांचे आणि जिल्हा वासीयांचे लक्ष लागून आहे !



# लोकविकास नागरी सहकारी बँकेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** लोकविकास नागरी सहकारी बँकेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१७ रोजी गुलाब विश्व हॉल, टि.व्हि सेंटर रोड, सिडको, औरंगाबाद येथे उत्साहात संपन्न झाली. सभेची सुरूवात जेष्ठ सभासदांच्या हस्ते दिप प्रज्वलन व लक्ष्मी पुजनाने झाली. यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात होवून विषय सुचीप्रमाणे सर्व ठरावांना टाळयांच्या कडकडामध्ये उपस्थित सभासदांनी सर्वानुमते मंजूरी दिली.

याप्रसंगी सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निराकरण करण्यात आले. सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित असलेल्या सभासदांनी आपले मनोगत व्यक्त करून बँकेच्या प्रगतीविषयी सभासदांनी समाधान व्यक्त केले. बँकेचे संचालक दिपक अहिरे व मुरलीधर जगताप यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा उपस्थित सभासदांसमोर प्रस्तुत केला. बँकेचे माजी अध्यक्ष नामदेवराव पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लोकविकास बँक हि बहुजनांची मराठवाडयातील एक अग्रसर बँक आहे, तिची हि ओळख कायम ठेवण्यासाठी सर्व सभासदांनी व संचालकांनी प्रयत्न करण्यांचे आवाहन केले. बँक व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब शेळके यांनीही बँकेच्या कार्यपध्दतीचे कौतूक केले.

बँकेच्या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला संबोधित करताना बँकेचे अध्यक्ष एकनाथ जाधव यांनी बँकेच्या वसुलीमध्ये आलेल्या अनुभवाचे कथन करून बँक स्पर्धेच्या युगात प्रगतीकडे वाटचाल करीत असताना सहकारी संचालक, सभासद व ग्राहकांच्या पाठींब्यामुळे हे शक्य होत असल्याचे नमूद केले. चालू अहवाल वर्षामध्ये बँकेचे ४ अत्याधुनिक ए.टि.एम.केंन्द्र सुरू केली आहे. लवकरच आय.एम.पी.एस. व यु.पी.आय.ची सुविधा बँकेच्या सभासद व ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बँकेने देवेंद्र फडणवीस यांच्या आदर्श व वास्तववादी कल्पकतेतून साकार झालेली अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या सर्व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून समाजातील तरूण होतकरू उदयोजक व व्यावसायिकाला उत्पन्नाचे शाश्वत साधन उपलब्ध करून दिले आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज योजनांचा मोठया प्रमाणात प्रचार व प्रसार करण्यांमध्ये लोकविकास बँक हि मराठवाडयातील अग्रगण्य बँक आहे. या योजनेत वाटप झालेल्या कर्जाचे थकबाकीचे प्रमाण अतिशय अत्यल्प आहे हि विशेष बाब आहे. अहवाल वर्षामध्ये बँकेने प्रगतीच्या सर्व क्षेत्रामध्ये नेत्रदिपक कामगिरी करून रू. १.८५ कोटीचा निव्वळ नफा प्राप्त केला आहे. यासाठी बँकेच्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळाले आहे. बँकेच्या सभासदांना आर्थिक वर्ष सन २०२१-२२ या वर्षासाठी १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला, त्यासाठी भारतीय रिजर्व बँकेची परवानगीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. बँकेच्या सर्व सेवा सुविधा व विविध कर्जे व ठेव योजनांचा लाभ सभासदांनी घ्यावा व लोकविकास बँकेच्या प्रगतीमध्ये आपला सहभाग नोंदविण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

याप्रसंगी गुणवंत विदयार्थी, ठेवीदार व नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या कर्जदारांचा सत्कार करण्यात आले. आभार प्रदर्शन बँकेचे उपाध्यक्ष रामदास फड यांनी केले. तसेच मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे व ठरावांना मंजूरी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संजय औटी यांनी घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बँकेच्या अधिकारी सौ.भाग्यश्री गायकवाड व सौ.अनिता साळवे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष एकनाथ जाधव, उपाध्यक्ष रामदास फड, संचालक विनायक गवळी, केशव तुपे, मुरलीधर जगताप, पोपट जाधव, माधव जेऊघाले, ललीत माळी, सौ. अनुराधा अंबादास दानवे, सौ.अलका अंबादास कुलकर्णी, संचालक सर्वश्री दिपक अहिरे, कचरदास राउत, सुदाम घावटे, किसन भादे, प्रशांत देसरडा, सुनिल ठाकरे, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब शेळके, डॉ.डि.एस.काटे, माजी अध्यक्ष नामदेवराव पवार, श्रीमंत उकिर्डे व मोठया संख्येने सभासदांची उपस्थिती होती.

# कृषि विभागामार्फत कुपोषित बालकांच्या कुटुंबास भाजीपाला किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** परिसरात तालुका कृषि अधिकारी सोयगाव एस.बी. पवार, मंडळ कृषि अधिकारी, फर्दापूर जे.के. जाधव व मंडळ कृषि अधिकारी, बनोटी एस.जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मा योजनेअंतर्गत तालुक्यातील विविध अंगणवाडी कार्यक्षेत्रात असणाऱ्या कुपोषित बलकांच्या कुटुंबियांसाठी भाजीपाला किटचे वाटप करण्यात येत आहे.

सदरील योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पोषणमूल्याअभावी होणारे कुपोषण कमी करणे, पोषणयुक्त - संतुलित व सुरक्षित अन्नाचा पुरवठा करणे या प्रकारची उद्दिष्टे साध्य केली जात आहेत. सदरील योजनेअंतर्गत तालुक्यातील 833 कुपोषित बालके असलेल्या कुटुंबांची निवड गावातील अंगणवाडी सेविका यांचे मार्फत करण्यात येत असून प्रथम टप्प्यात सोयगांव तालुकयास 333 भाजीपाला किटचे वाटप करण्यात येत आहे.

त्यानुसार तालुक्यात दि.16-07-2022 रोजी मौजे जामठी, तितुर व उप्पलखेडा येथील कुपोषित बलकांच्या कुटुंबीयांना भाजीपाला किट सरपंच, उपसरपंच यांचे हस्ते अंगणवाडी सेविका, कृषि सहाय्यक व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, आत्मा यांचे उपस्थित वाटप करण्यात आले.



# जीडीपीच्या ९० टक्के कर्ज

आधुनिक केसरी

श्रीलंकेच्या आर्थिक संकटामागे कर्ज घेऊन देशाचा विकास करण्याचा प्रयत्न केला असल्याचे समोर आले आहे. श्रीलंकेची दिवाळखोरी पाहता भारतातही अशीच स्थिती निर्माण होण्याची शक्यता सोशल मीडियावर व्यक्त करण्यात येत आहे. श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेच्या अपयशाचे खरे कारण देशाच्या एकूण जीडीपीपेक्षा जास्त असणारे कर्ज हे असल्याचे सांगितले जात आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनुसार, २०२० मध्ये भारतावरही त्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ९० टक्के इतके कर्ज होते. श्रीलंकेच्या आर्थिक अपयशामागे खरचं हे कारण आहे, की आणखी काही. तसेच भारताची तुलनात्मक स्थिती या देशांपेक्षा चांगली आहे का? जर आपण आंतरराष्ट्रीय आर्थिक आकडेवारीवर नजर टाकली तर, जगातील टॉप-३ अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट असलेल्या जपान आणि अमेरिकेच्या तुलनेत कर्ज आणि जीडीपीचे प्रमाण १०० टक्क्यांहून अधिक आहे. त्यांच्या व्यतिरिक्त फ्रान्स, स्पेन आणि कॅनडा सारख्या विकसित अर्थव्यवस्थांमध्ये ही परिस्थिती आहे, परंतु या देशांबद्दल कोणत्याही प्रकारच्या आर्थिक संकटाच्या बातम्या पाहायला आपल्याला मिळत नाहीत. जपानचे कर्ज ते जीडीपीचे प्रमाण २५० टक्क्यांहून अधिक आहे. IMF च्या मते, या यादीत भारताचे स्थान चीन (७७.८४%), पाकिस्तान (७१.२९%), बांगलादेश (४२.६%) च्या कर्ज ते जीडीपी प्रमाणापेक्षा चांगले आहे. कोणत्याही देशाची आर्थिक ताकद जाणून घेण्यासाठी अनेक पॅरामीटर्स वापरले जातात. कर्ज ते जीडीपी गुणोत्तर हा या उपायांपैकी एक आहे. कर्ज ते जीडीपी गुणोत्तर जाणून घेण्यासाठी, देशावरील एकूण कर्जाला देशाच्या एकूण जीडीपीने भागले जाते. यावरून एखादा देश कर्ज फेडण्यास किती सक्षम आहे, याचा अंदाज येतो. जागतिक बँकेच्या संशोधनानुसार, कोणत्याही उदयोन्मुख अर्थव्यवस्थेसाठी कर्ज ते जीडीपी गुणोत्तर ६४ टक्के असावे. जर हे प्रमाण १० टक्क्यांनी वाढले तर जीडीपी ०.२ टक्क्यांनी कमी होईल. पण त्याचवेळी तुमची आर्थिक वाढ वेगाने होत असेल तर कर्ज ते जीडीपी गुणोत्तर आणखी वाढू शकते, असा विश्वास आहे. अशा परिस्थितीत पुढील आर्थिक वर्षात हे प्रमाण सुधारताना दिसेल. कोणत्याही देशाची आर्थिक ताकद मोजण्यासाठी आणखी एक उपाय आहे, ज्याला बाह्य कर्ज ते जीडीपी असे म्हणतात. याचा अर्थ कोणत्याही देशावरील कर्जाचा विदेशी हिस्सा किती आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि सेंट्रल बँक ऑफ श्रीलंका यांच्या आकडेवारीवरून, दोन्ही देशांच्या जीडीपी आणि बाह्य कर्जामध्ये तिप्पट फरक असल्याचे आपण पाहू शकतो. भारतावरील परकीय कर्ज केवळ १९.६ टक्के आहे, तर श्रीलंकेचे परकीय कर्ज गेल्या अनेक वर्षांपासून ६० टक्क्यांच्या वर आहे. यासोबतच आणखी एक महत्त्वाची पद्धत म्हणजे अल्प-मुदतीच्या कर्जाचे प्रमाण (मूळ परिपक्वता) ते परकीय चलन साठा. याचा अर्थ एका वर्षाच्या आत परतफेड करण्यासाठी कोणत्याही देशाकडील कर्ज आणि परकीय चलन गंगाजळी यांचे प्रमाण किती आहे. भारताचे प्रमाण २० टक्के आहे, तर श्रीलंकेत हे प्रमाण परकीय चलनाच्या साठ्यात झपाट्याने घट झाल्यामुळे घसरले आहे. त्यामुळे त्यांना कर्जाची परतफेड करता आली नाही. त्यानंतर कोणत्याही देशाची विश्वासार्हता घसरल्याने परिस्थिती बिकट ओढावली जाऊ शकते.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# लठ्ठपणा धोकादायक वळणावर...

आधुनिक केसरी

**येत्या 30 वर्षांत म्हणजे 2050 सालापर्यंत जगातील निम्मी लोकसंख्या 'ओव्हरवेट' म्हणजेच ज्यादा वजनाची असेल. अनहेल्दी म्हणजेच पौष्टिकता नसलेला आहार हाच लठ्ठपणाला कारणीभूत ठरेल. जगातील सुमारे 150 कोटी लोक अशा खाण्यामुळे लठ्ठपणाशी झुंज देतील, अशी धक्कादायक माहिती जर्मनीच्या संशोधकांच्या अभ्यासातून समोर आली आहे. जर्मनीच्या वैज्ञानिकांनी लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयीवरून हे अनुमान काढले आहेत. पॉट्सडॅम इन्स्टिट्यूट फॉर क्लायमेट इम्पॅक्ट रिसर्च या संस्थेने याबाबतचे संशोधन केले आहे. सध्या लोक ज्या पद्धतीचा आहार घेत आहेत, तसाच आहार पुढे चालू राहिला तर येत्या 30 वर्षांत लोकांच्या शरीरात पोषक घटकांची तीव्र कमतरता दिसून येईल.**

दुसरीकडे 30 वर्षांनंतर 50 कोटी लोकांचे वजन हे सरासरीपेक्षा कमी असेल. हे लोक भूक आणि काम या गोष्टीसाठी लढताना दिसतील, असे संशोधकांचा अभ्यास सांगतो. या दोन्ही गोष्टी जगाला संकटात टाकणाऱ्या आहेत. एकीकडे माणसे लठ्ठपणा मुळे विविध आजाराने ग्रासलेली असतील तर दुसरीकडे काम नसल्याने आणि दुसरीकडे सकस आहार मिळत नसल्याने लोक भूकबळीला बळी पडतील. कोरोना महामारीच्या संकटामुळे पुढील वर्ष गरीब देशासह अन्य  लोकांवर उपासमारीची वेळ येणार असल्याचे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वर्ल्ड फूड प्रोग्रामच्या प्रमुखांनी म्हटले आहे. जगाने या दोन्ही गोष्टींकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

'वर्ल्ड ओबेसिटी फेडरेशन या आणखी एका संस्थेने भारतासह जगभरातील 200 देशांमध्ये पाहणी करून एक अहवाल तयार केला आहे. जगभरात 2030 पर्यंत दर पाचपैकी एक महिला आणि दर सातपैकी एक पुरुष लठ्ठपणाशी झुंजत असेल, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे. केवळ आठ वर्षांनंतरच जगात 100 कोटींपेक्षा अधिक स्त्री-पुरुष लठ्ठपणाच्या समस्येने ग्रासलेले असतील असे म्हटले आहे. विशेष म्हणजे, लठ्ठ लोकांची संख्या वाढण्याचा दर 2010 च्या तुलनेत दुप्पट असेल. लठ्ठ लोकांची संख्याही 2010 च्या दुप्पट असेल.

भारतात 13.5 कोटी लोक लठ्ठपणाशी झगडत आहेत. तसेच इतर आजारांशीही लढा देत आहेत. भारतातील 7.2 कोटी लोक मधुमेह आणि 8 कोटी लोक उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. सीडीसी या अमेरिकेतील सर्वात मोठ्या आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे की, 2009  आणि 2010 या काळात अमेरिकेतील 35.7 टक्के लोक आधीच लठ्ठपणाने ग्रस्त होते. 2018 पर्यंत ही आकडेवारी 42.4 टक्क्यांपर्यंत वाढली होती. कोरोनामुळे मृत्यू पावणाऱ्या संख्येत अमेरीका आघाडीवर आहे. ही संख्या का वाढली असेल, याचा अंदाज यायला हरकत नाही. ब्रिटनमधील 28 टक्के लोक लठ्ठपणाचा सामना करत आहेत. जर्मन शास्त्रज्ञांच्या मते, जगभरात लठ्ठपणाने हृदयरोग आणि मधुमेहांच्या रुग्णांमध्ये वाढ होईल. त्यामुळे कोरोनासारख्या साथ रोगात मृत्यूचा धोकाही वाढतो.

शरीराच्या गरजेपेक्षा जास्त कॅलरीज जेव्हा सेवन करण्यात येते तेव्हा त्याचे रूपांतर चरबीत होते. सुरुवातीला चरबीच्या पेशी आकाराने वाढतात. जेव्हा आकाराची मर्यादा संपते, त्यानंतर दुसऱ्या पेशी तयार होण्यास सुरुवात होते.



अशा प्रकारे चरबीच्या पेशी वाढत जातात व स्थूलपणा येतो. जेव्हा वजन कमी होते. त्या वेळेस चरबीच्या पेशींचा आकार कमी होतो. पण संख्या कमी  होत नाही. आहार. आजच्या फास्ट फूडच्या जमान्यात उच्च उष्मांकयुक्त (हाय कॅलरी फूड) सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पौष्टिक घटक मिळत नाहीत. मात्र, यामुळे शरीरावर अतिरिक्त चरबीचं प्रमाण वाढू लागते. या बाबतीत लहान मुलांकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. लहान मुलांची जीवनशैलीही लठ्ठपणासाठी कारणीभूत ठरतेय. हल्ली लहान मुले टीव्ही आणि मोबाइल या गोष्टींमध्ये फार वेळ घालवतात. मैदानवर जाण्याचे आणि शारीरिक क्रिया करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे लठ्ठपणा वाढतो आहे. याशिवाय लठ्ठपणाचे सर्वांत दुर्लक्षित कारण म्हणजे, हॉर्मोनल समस्या. शरीरात संप्रेरकांमुळे शरीरातील कार्याचे नियमन होते. त्यापैकी एक संप्रेरक म्हणजे 'थायरॉइड हॉर्मोन'. हे संप्रेरक अतिरिक्त स्रवल्याने लठ्ठपणा आणि शरीरावर अनैसर्गिक सूज दिसू शकते.

1965 सालापासून जगभरात खाण्यापिण्याच्या सवयीतबद्दल झाला. लोकांच्या अन्नात प्रोसेस्ड फूड, उच्च प्रथिनांचे मासांहार, जास्त साखर असणारे पदार्थ आणि कार्बोहायड्रेट समाविष्ट झाले. हळूहळू प्रक्रिया केलेले अन्न तयार होऊ लागले. असे अन्न स्वस्त दरांत उपलब्ध होते आणि ते तयार करताना मशीनरीचा वापर होत असल्याने जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचणे शक्य होते. प्रोसेस्ड फूडमध्ये पोषक मूल्ये कमी असतात. अशा अन्नात अनेक रसायनांचा वापर केला जातो. या सर्व गोष्टींमुळे 2010 पर्यंत जगातील 29 टक्के लोकांचे वजन ओव्हरवेट झाले होते. 9 टक्के लोक लठ्ठपणाला तोंड देत होते.

शरीराला काम करण्यासाठी जी ऊर्जा हवी असते ती कॅलरीजपासून मिळते. शरीराच्या गरजेपेक्षा कॅलरीज घेण्यात आल्यास त्या साठवून राहतात व लठ्ठपणास सुरुवात होते. बैठे काम करणा-या लोकांमध्ये लठ्ठपणा जास्त आढळून येतो. आनुवंशिकता हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे.थॉयरॉइडच्या आजारामुळे, विशेषतः हायपोथॉयरॉडिझममुळे वजन वाढतेय. इन्सुलिनोमा ज्या रुग्णामधील रक्तातील साखरेचे प्रमाण नेहमी कमी होते (हायपोग्लायसेमिया) अशा रुग्णांना वारंवार खावे लागते त्यामुळेही वजन वाढते. मानसिक आजार  विशेषतः डिप्रेशन असणा-या रुग्णांना वारंवार जेवण्याची सवय असते. त्यामुळेही वजन वाढते. स्त्रियांमध्ये गरोदरपणात व नंतर 8 ते 10 किलो वजन वाढते व ते नंतर कंट्रोल न केल्यास तसेच राहते.

ब्लड प्रेशर (रक्तदाबाचा त्रास), डायबेटीस (मधुमेह) जसे आयुष्यभर राहतात तसेच लठ्ठपणाकडे दुर्लक्ष केल्यास तोही आयुष्यभराचा सोबती होऊन बसतो. यामुळे दैनंदिन कामकाजावर परिणाम होतो. थकवा लवकर येणे. दिवसभर सुस्तपणा, कामात उत्साह न वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे, घोरणे, डायबेटीस, हायपरटेन्शन, गुडघ्यावर अतिरिक्त भारामुळे गुडघेदुखी, कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढणे, वंध्यत्व येणे, तळहात तळपायाची आग होणे व मुंग्या येणे आदी दुष्परिणाम जाणवतात.

लठ्ठपणा नियंत्रणात राहण्यासाठी काही सोपे उपाय आहेत. ज्यांनी चांगला फायदा होतो. एकाच वेळी पोटभर जेवणे टाळावे. रात्रीचे जेवण थोडे हलके घ्यावे. जेवणानंतर एक तास आडवे पडू नये. तेलकट, तुपकट, शिळे जेवण, बटाटा, भात, दुधाचे पदार्थ (पनीर, बटर, चीज) नॉन व्हेज आदी पदार्थ  टाळावेत तर सलाड (काकडी, टोमॅटो, बीट, मुळा) कडधान्ये (मूग, मटकी, चवळी) भाज्यांचे सूप या पदार्थांचे सेवन वाढवावे. लठ्ठपणा नियंत्रणात राहण्यासाठी सर्वात सोपा परवडणारा आणि अतिशय परिणामकारक व्यायाम म्हणजे (ब्रिस्क वॉकिंग) म्हणजे वेगाने चालणे, चालताना  घाम आला पाहिजे. रोज कमीत कमी 40 मिनिटे ब्रिस्क वॉक घेतला पाहिजे. घाम येणे म्हणजे शरीरातील चरबी (फॅट) जळणे. जितका जास्त घाम येईल तितके चांगले. व्यायामात नियमितता असावी व व्यावसायिक प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करावा. लठ्ठपणा हा ऐकण्यास जितका साधा सरळ वाटतो तितकाच तापदायक. वेळीच उपाय न केल्यास गंभीर स्वरूपाचे परिणाम दिसून येतात. शेवटी आपल्या तब्येतीची काळजी आपल्यालाच घ्यायची आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# भारताची शान : बॅडमिंटन क्वीन पी. व्ही सिंधू

आधुनिक केसरी

**भारताची फुलराणी, बॅडमिंटन क्वीन पी. व्ही. सिंधूने सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावत इतिहास रचला आहे. या स्पर्धेचे विजेतेपद पटकवणारी सिंधू ही पहिलीच भारतीय खेळाडू आहे. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात तिने चीनच्या वांग झी हीचा सरळ तीन सेटमध्ये पराभव केला. या विजेतेपदामुळे तिचे देशभर कौतुक होत आहे. मात्र आज तिच्यावर कौतुकाचा वर्षाव करणारे काही महाभाग काही दिवसांपूर्वी तिच्यावर टीका करीत होते कारण मागील वर्षांपासून तिचा हरवलेला फॉर्म.  खूप  प्रयत्न करूनही तिला मोठ्या स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावायला अपयश येत होते.**

मोठ्या स्पर्धेत ती धडाक्यात सुरवात करीत होती मात्र उपांत्य किंवा अंतिम फेरीत ती अपयशी ठरत होती त्यामुळे सिंधू संपली. तिच्या निवृत्तीची वेळ जवळ आली आहे अशी तीची हेटाळणी होऊ लागली होती. त्यात काही माजी खेळाडूही होते. सिंधू मात्र या टिकेकडे दुर्लक्ष करून आपल्या खेळाकडे लक्ष देत होती. हरवलेला फॉर्म परत मिळवण्यासाठी रात्रीचा दिवस करीत होती. आपल्या  टीकाकारांना तोंडाने नव्हे तर आपल्या खेळाने उत्तर देण्याचा निश्चय तिने केला होता आणि आज हे विजेतेपद पटकावून तिने टीकाकारांची तोंडे बंद केली  आहे.  हे विजेतेपद पटकावून तिने तिच्यातील विजूगिशी वृत्तीची झलक दाखवून दिली आहे. इतकेच नाही तर या विजेतेपदामुळे तिने आगामी ऑलिम्पिक स्पर्धेसाठीही आपण तयार असल्याचे दाखवून दिले आहे. ऑलिम्पिक स्पर्धा आणि तिचे तर जिवाभावाचे नाते आहे. गेल्यावर्षी टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकत तिने देशाचा तिरंगा डौलाने फडकवला होता.  पी व्ही सिंधूचे हे सलग दुसरे ऑलिम्पिक पदक होते. २०१६ च्या रियो ऑलिम्पिकमध्येही पी व्ही सिंधूने रौप्यपदक जिंकले होते. सलग दोन ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक मिळवून देणारी पी. व्ही. सिंधू ही पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली होती.   सलग दोन ऑलिम्पिक पदक जिंकून पी. व्ही. सिंधूने इतिहास घडवला होता. आताही तिने सिंगापूर खुल्या स्पर्धेचे विजेतेपद मिळवून इतिहास घडवला आहे.  देशवासीयांना अभिमान वाटेल अशीच तिची ही कामगिरी आहे. तिच्या कामगिरीने देशवासीयांची छाती अभिमानाने फुगली आहे. केवळ देशातच नव्हे तर जगभर तिचे कौतुक होत आहे. आज तिला हे यश मिळाले असले तरी यामागे तिची गेल्या अनेक वर्षाची खडतर मेहनत आहे. आजवर तिला अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागले आहे.

तिला मिळालेले हे यश एका रात्रीत मिळालेले नसून त्यामागे अनेक वर्षाची तपश्चर्या आहे.

५ जुलै १९९५ रोजी हैदराबाद येथे जन्मलेल्या पी. व्ही. सिंधूचे आई - वडील देखील क्रीडापटू होते. तिचे वडील पी. व्ही. रमन्ना आणि आई पी. विजया राष्ट्रीय स्तरावर व्हॉलीबॉल खेळले आहेत. तिच्या वडिलांना अर्जुन पुरस्कार मिळाला आहे. आपल्या मुलीने देखील क्रीडाक्षेत्रात करियर करून देशाचे नाव उज्ज्वल करावे असे स्वप्न या दोघांनी पाहिले. पी. व्ही. सिंधुची उंची आणि तिची चपळता पाहून त्यांनी तिच्या हातात रॅकेट दिली. बॅडमिंटन हाच तिच्यासाठी योग्य खेळ आहे हे तिच्या आई वडिलांनी तिच्या लहानपणीच जाणले आणि वयाच्या आठव्या वर्षापासून तिला बॅडमिंटनचे प्रशिक्षण देण्यास सुरवात केली. तिनेही बॅडमिंटनमध्ये स्वतःला झोकून दिले. दररोज सकाळ संध्याकाळ ती सराव करायची. स्वतःचा फिटनेस राखण्यासाठी व्यायाम करायची. तिला आईस्क्रीम खूप आवडायचे पण बॅडमिंटन साठी तिने आईस्क्रीम खाणे सोडून दिले. तिचे एकच लक्ष होते ते म्हणजे बॅडमिंटन खेळणे आणि देशासाठी पदक जिंकणे. २००९ साली सिंधूने कोलंबोमध्ये ज्युनियर आशिआई बॅडमिंटन स्पर्धेत सहभाग घेतला. सिंधूची ही पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा ठरली होती. २०१२ साली लंडन ऑलिम्पिकची चॅम्पियन ली जुरेली हीचा पराभव करून तिने सर्वांचं लक्ष वेधून घेतले होते. सप्टेंबर २०१२ साली वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी सिंधूचा जगातील टॉप - २० महिला बॅडमिंटनपटूंमध्ये समावेश झाला. २०१३ साली वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत कांस्यपदकाची कमाई करत सिंधूने या स्पर्धेत भारतासाठी पहिले पदक जिंकून दिले. त्यानंतर २०१५ हे साल वगळता तिनं २०१९ सालापर्यंत प्रत्येक वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत पदकांची कमाई केली. तिचा पदकांचा हा सिलसिला सिंगापूर खुल्या टेनिस स्पर्धेपर्यंत चालू आहे.  सर्व महत्वाच्या स्पर्धेत भारतासाठी पदकांची कमाई करणारी पी व्ही सिंधू ही भारताची शान आहे. ती देशवासीयांसमोर एक प्रेरणा आहे. तिच्याकडून प्रेरणा घेऊन भविष्यात आणखी पी व्ही सिंधू निर्माण होतील यात शंका नाही. पी व्ही सिंधूचे मनापासून अभिनंदन!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शाळा: समता पेरण्याचं केंद्र!



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**शाळा समता पेरण्याचं केंद्र आहे असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण सुरुवातीला जी मुलं शाळेत येतात. त्यांना कोणताच भेदभाव माहित नसतो. हळूहळू हा भेदभाव माहित होतो तो घरुन नाही तर शाळेतूनच. कारण मुलं ही अनुकरण प्रिय असतात. ती आपल्या शिक्षकांचं अनुकरण करीत असतात. तो शिक्षण आपल्याप्रती व्यवस्थीत वागतो का? आपला लाड करतो का? याचा विचार करीत तो वागत असतो. यात जर आपण आपल्या शाळेत संस्थाचालकाच्या वा मुख्याध्यापकाच्या दबावात काम करीत असू तर आपण आपल्या शिक्षकी पेशाला न्यायच देवू शकत नाही. म्हणून निदान शिक्षकांनी तरी कोणाच्या दबावात काम करु नये. विद्यार्थ्यांचा लाड करावा. त्यांना अपशब्द बोलू नये. त्यांना समानतेच्या गोष्टी सांगाव्यात. जेणेकरुन तेच समानतेचे संस्कार त्यांच्यावर होतील व जीवनात ते कोणालाही असमान लेखणार नाहीत. अपशब्द बोलणार नाहीत. कारण बालपणातच झालेले संस्कार हे चिरकाल टिकत असतात.**

जात, स्त्री पुरुष समानता हे मुल्य अगदी या कोवळ्या बालवयापासूनच मुलांच्या मनात बिंबवायला हवी. त्यादृष्टीनं प्रयत्न व्हायला हवा. शाळा........एक समता पेरणारं दालन. या ठिकाणी लहान लहान मुलं येत असतात. त्यांचं वय कोवळं असतं. त्यांना साधं त्यांच्या बाबाचंच नाव माहित नसतं तर जात कशी काय जात कशी काय माहित असणार. लहान मुलांना माहित नसते जात. ते वेगळ्याच विश्वात जगत असतात. परंतू कालांतरानं त्यांना जात माहित होते शिक्षक विचारतात तेव्हा.

शिक्षक विचारतात, "हं, सांगा आपल्या वर्गात अनुसूचीत जातीचे कोण कोण आहेत?'

विद्यार्थ्यांना ते कळत नाही. तेव्हा शिक्षक विचारतात, 'हं, सांगा, कोणाचे वडील कार्पोरेशनला कामाला जातात? कोणाचे वडील बकरे कापतात? कोणाचे वडील वाजा वाजवतात तसेच कोणाचे वडील चपला विकतात शिवतात बनवतात?' वैगेरेवैगेरे नानात-हेचे शिक्षकांचे प्रश्न. विद्यार्थ्यांना त्यांचे वडील कोणती कामे करतात ते अगदी चांगलं माहित असतं. त्यातूनच जात माहित होतं विद्यार्थ्यांना. तसेच शिष्यवृत्तीचे फार्म भरीत पालकही आपल्या पाल्यांना जातीचा हवाला देवून सांगतात की अमूक फार्म भरायचा आहे. मैडमला विचारशील.' मुले मॅडमला विचारतात. येथूनच मुलांच्या मनात जातीचा उगम होतो. मुले जसजशी मोठी होतात. तशी जात व धर्म विद्यार्थ्यांना कळतो. मग हा अमूक जातीचा हा तमूक जातीचा असा भेदभाव तयार होतो.

ती मुलगी आहे. मी मुलगा आहे. मुलीसाठी सावित्रीबाई शिष्यवृत्ती मुलांना दुसरी. या सर्व गोष्टी समता पेरणा-या गोष्टी नाहीत. मुळात विद्यार्थ्यांना ओळखण्यासाठी जातीची गरज नाही. तसेच सर्व वर्गखोल्यातून समताच विकसीत व्हायला हवी.

परंतू कोण करणार? अजून तरी एकदा डॉक्टर बाबासाहेबांना जन्म घ्यावा लागेल. परंतू तसे होणे शक्य नाही. कारण पुनर्जन्म अशक्य अशी बाब आहे. भारत आमचा देश. आम्ही दररोज वर्गावर्गात संविधान म्हणतो. समता, बंधूता आणि न्याय तोही समान जोपासण्याची प्रार्थना नव्हे तर शपथ घेतो. परंतू असा समान न्याय जोपासतो का? तर याचं उत्तर नाही असंच आहे. आम्ही देशात तर राहतो खरे. परंतू माणसाला माणसासारखं आजही वागवीत नाही. जात जात करीत करीत आजही जातीच्याच बुगड्यानं चालतो. आपलीच जात कशी श्रेष्ठ हे दाखवून देण्याचा प्रयत्न करतो. इतर जातींना कनिष्ठ समजतो. अनुसूचीत जातीची तर पर्वाच नाही. प्रसंगी आदिवासींना आपण जवळ करतो. परंतू अनुसूचीत जातींना नाही.

डॉक्टर बाबासाहेबांनी संविधान बनवलं म्हणून थोडासा फरक पडला. आता इतर समाजाच्या बरोबरीनं बसता येते. त्यांच्यासोबत जेवनही करता येते. व्यवहार देखील. नाहीतर संविधानापुर्वी माणसाची स्थिती पशूसारखीच होती. पशूला जसं आज आपण गुलामासारखं कैद करतो. त्याला बरं वाटो की नको, कामाला लावतो. अशीच स्थिती. आज ती स्थिती बदलली असली तरी पुर्णतः बदललेली नाही. ब-याच ठिकाणी असा जातीचा भेदाभेद आहे आणि महिला पुरुषांचाही.

हा अमूक जातीचा हा तमूक जातीचा असा भेदभाव आजही आहे आणि तो प्रकर्षानं जाणवतो. परंतू अशी कोणाची जात काढणं म्हणजे गुन्हा असल्यानं कोणी कोणाची जात काढत नाहीत. समतेनं वागण्याचा दिखावा करतात. यात अपवादात्मक काहीजण नक्कीच चांगले आहेत. ते समजून घेवून वागतात.

परंतू काहीजण नक्कीच चांगले नाहीत. ते तर जे चांगले वागतात. त्यांनाही बिघडविण्याचा प्रयत्न करतात. मुळात जातीच्या बाबतीत सांगायचं झाल्यास आरक्षण आहे. म्हणून इतर जातींना नोकरी, शिक्षण तसेच इतर ठिकाणच्या संध्या आहेत. नाहीतर कोणीही इतर मागासलेल्या जातींना विचारलं नसतं व हा समाज आज शिक्षण घेवू शकला नसता आणिनोक-याही मिळवू शकला नसता. आज सरकारी कार्यालयात नियुक्त्या करतांना बिंदू नामावली पाहिली जाते. अनुसूचीत जातीचे किती? अनुसूचीत जमातीचे किती? त्यावरच आधारीत अनुदान दिलं जातं. नाहीतर अनुदानही दिलं जात नाही. परंतू आजही हा बिंदू नामावलीचा नियम धाब्यावर बसवून ब-याच सरकारी शाळेत अनुसूचीत जाती जमातीची पदं न भरता केवळ आणि केवळ इतर एकाच समाजाची पदं भरलेली आहेत. हे विशेषतः शाळेच्या बाबतीत घडलेले आहे. ज्या ज्या शाळा ओबीसीच्या आहेत. तिथे बरेच कर्मचारी ओबीसी आहेत आणि ज्या शाळा एससी संस्थाचालकाच्या आहेत. तिथे बरेच कर्मचारी एससी. संस्थाचालकाची जी जात असेल, तीच जात जास्त. कारण त्याला घरच्या, तसेच जवळच्या सर्व नातेवाईकांना नोकरीला लावायचे असते. इतर जातींना नाही. अनुसूचीत जाती जमातींना तर नाहीच नाही. ती संचालक मंडळी रोस्टर पुर्ण करायचा असल्यानं केवळ नावापुरतं अनुसूचीत जातींना प्राधान्य देतात वा जमातींना. त्यातच एक पळवाट काढतात. ती म्हणजे संबंधीत उमेदवार मिळाला नाही. म्हणून आपल्याच जातीतील उमेदवाराची नियुक्ती. यात म्हणायचं एवढंच की रोस्टर पुर्ण करतांना संबंधीत उमेदवार का मिळत नाही. मिळतो, परंतू आपल्या नातेवाईकाची पदभर्ती करायची असल्यानं तो उमेदवार न मिळाल्याचा दाखला देवून बिंदू नामावलीला छेद दिला जातो. हे झालं अनुसूचीत जातीजमातीबाबत. मुळात स्त्रीयाबाबतही सरकारी क्षेत्रात अशीच मानसिकता आहे. स्त्रियांनी नोकरी करु नये म्हणून तिलाही अशा प्रशासकीय ठिकाणी बराच त्रास दिला जातो. तिला टोमणे, मारणे, छेडछाड करणे, टाँगटिंग करणे इत्यादी सर्व गोष्टी. काही ठिकाणी असे संस्थाचालक स्त्रियांचे लपूनछपून फोटोही काढतात. काही ठिकाणी स्त्रिया शारिरीकदृष्ट्या शिकविण्यास सक्षम नाही म्हणून त्यांना मेडीकल तपासणी करायला जाणूनबुजून पाठवलं जातं. अशी दुर्बल मानसिकता. तसेच ज्या ज्या ठिकाणी शाळा नाही, फक्त कार्यालय आहे. तिथे तर काही औरच प्रकार घडतात. जे स्त्री चरित्राला शोभत नाहीत. हा मानसीक छळच असतो स्त्रियांचा. परंतू नोकरी आहे आपली. वेतन कोण देणार. नोकरी जाईल विनाकारण. म्हणून सा-या महिला गप्प असतात. निमूटपणे आपल्यावर होणारा अत्याचार सहन करतात. आपल्या बॉसबद्दल कधी ब्र देखील काढत नाहीत आणि काढलाच तर त्याचे परिणामही गंभीर स्वरुपाचे आढळून येत असतात. महत्वाचं म्हणजे भारतासारख्या विकसीत देशात अशी परिस्थीती का निर्माण व्हावी? लोकांनी माणसाला माणसासारखं का वागू देवू नये? स्त्रियांनाही कार्यालयात समानतेनं का वागवू नये आणि अनुसूचीत जाती जमातींना का समस्या निर्माण व्हावी? याला जबाबबदार कोण?

आज याबाबत सांगायचं झाल्यास याला जबाबदार न्यायालय आहे. न्यायालयातून अशी विकृत मानसिकता जोपासणा-या घटकाला दंड होत नाही. म्हणूनच अशा प्रकरणात त्यांची हिंमत वाढते व ते गुन्ह्यावर गुन्हे करीत जातात. याबाबतीत एक प्रकरण सांगतो. प्रकरण आहे एका शाळेतील मुख्याध्यापकाचं. त्याचं एका शिक्षक कर्मचा-यासोबत भांडण झालं. तो शिक्षक कर्मचारी अनुसूचीत जातीतील होता. पर्यायानं या भांडणात शिवीगाळही झाली. त्यातच जातीवाचक शिव्याही निघाल्या. मग काय जाती काढण्यावरुन मारपीटही.

सदर शिक्षकानं त्या मुख्याध्यापकाची तक्रार पोलिस स्टेशनला टाकली. पोलिसांनी चौकशीअंती तो खटला न्यायालयात नेला. शेवटी खटला सुरु झाला. खटल्यामध्ये आरोपीच्या बाजूने खाजगी वकील होता व सदर शिक्षकाच्या बाजूनं सरकारी वकील. सरकारी वकील संबंधीत पार्टीला पैक झाला. त्यातच त्या खटल्याचा न्याय न्यायालयातून पक्षकाराच्या बाजूनं गेला.

आपल्याला न्यायालयातही न्याय मिळाला नाही म्हणून पक्षकारानं तो खटला उच्च न्यायालयात टाकला नाही. तो चूप बसला. परंतू आरोपी चूप बसला नाही. त्यानं



उलट अपील दाखल केली आणि कोर्टाला सांगीतलं की असं प्रकरण घडलंच नाही. हे सर्व थोतांड आहे. तो खटला न्यायालयात सुरु असतांना संबंधीत व्यक्ती मरण पावला. त्यावर वारसांनी तो खटला लढण्यासाठी अर्ज केला.

महत्वाचं म्हणजे खटल्यांचा निकाल काय लागो ते लागो. परंतू असे जर खटले उभे राहात असतील आणि न्यायालयातून असा संबंधीत ज्या व्यक्तीवर अत्याचार झाला, त्याला न्याय जर मिळत नसेल. शिवाय त्या व्यक्तीला पराभवाचा सामना करावा लागत असेल. व्यतिरीक्त त्याच पराभवी व्यक्तीवर पुन्हा परत खटला दाखल करुन त्याची प्रताडणा केली जात असेल, तर त्यानं जगायचं कसं? का? त्याचा दोष आहे का की त्याचा जन्म अनुसूचीत जातीत झाला? का, अशावर अत्याचार झाल्यावर त्यानं न्यायालयात दाद मागू नये? त्यानं निमुटपणे अत्याचार लहन करावे? इतर लोकांनी त्याचेवर अत्याचारच करीत जावेत. इत्यादी गोष्टी आज सर्रासपणे समाजात घडत असल्यानं आजही जातीजातीतील अत्याचार दूर होत नाहीत. उच्च जातीवंतांना माहित असतं की आपण एकदा का सुटलो की आपणच संबंधीत पक्षकारावर खटला दाखल करु. मग कसे अत्याचार दूर होतील अनुसूचीत जाती आणि जमातीवरील? कसे अत्याचार दूर होतील स्त्रियांवरील. इथे तर बलत्कार करुनही न्यायालयातून निर्दोषता सिद्ध करणारे घटक बरेच आहेत आणि त्यांना निर्दोष बाइज्जत बरी करणारेही घटक न्यायालयात भरपूर आहेत. जे वकील म्हणून काम करतात. खरं तर त्यांना झालेल्या अत्याचाराचं काही घेणंदेणं नसतं. फक्त पैसा कमवणं हाच उद्देश असतो. मग कसा आज भेदभाव दूर होईल आणि कशी भेदभावाची मानसिकता नष्ट करता येईल? ती मानसिकता बदलविताच येणे शक्य नाही.

विशेष म्हणजे ज्या शाळेतून विद्यार्थी मनात समता पेरली जावी. त्याच विद्यार्थ्यांच्या मनात जातीभेदाचं स्फुर्लिंग फुलवलं जातं. त्यांना जात शिकवली जाते. त्यांना जातीची वैलेडीटी (जात पडताळणी) मागीतली जाते नव्हे तर जातीला जीवंत ठेवले जाते.

महत्वाचं म्हणजे कशाला हव्या जाती? का, जात काढून जातीजातीत कलह माजविण्यासाठी जाती असाव्यात का? का, स्वार्थ साधून घेण्यासाठी जाती असाव्यात का? का, निवडणूकीत जातीची गलेलठ्ठ मते मिळविण्यासाठी जात असावी का? जर यासाठी जात हवी असेल तर खुशाल ठेवावी जात आणि भेदभावही खुशाल होवू द्यावा. तसेच जातीवाचक शिवीगाळही. त्यातच कोणीही खटले दाखल करु नये आणि न्यायालयानेही वेळ जातो फालतूचा म्हणून असे अनुसूचीत जातीचे, खटलेच दाखल करुन घेवू नये. तसेच ज्या न्यायालयातून स्त्रियांनाही न्याय दिला जात नसेल, त्याही न्यायालयानं अशा स्त्री अत्याचाराचे खटलेच दाखल करु नये. होवू द्यावे अनुसूचीत जाती जमातीसारखेच त्यांचेवर अत्याचार. दररोज निरनिराळ्या मुलींवर अत्याचार व्हावेत. असंच न्यायालयाला वाटतं का? आज अरुणा शानबाग जीवंत नाही. परंतू प्रकरण मात्र जीवंत आहे. तिच्यावर बावीसव्या वर्षी बलत्कार झाला. त्यात ती बेशुद्ध झाली. ती तब्बल बेचाळीस वर्ष कोमात होती. त्यानंतर ती कोमातल्या अवस्थेतच मरण पावली. एवढा क्रुर बलत्कार! बलत्काराची शिक्षा झालेला तिचा बलात्कारी... बलत्काराची सात वर्षे शिक्षेची पुर्ण होताच तो सुटला. त्यानं दुसरी पत्नीही केली. परंतू अरुणा मरतपर्यंत त्या शिक्षेतून सुटली नाही. का? तिचाच गुन्हा होता का? खरं तर ती होशमध्ये येईपर्यंत तो आरोपी सुटायला हवा नव्हता. शिवाय सोडलेच तर न्यायालयानं तिची काळजी घ्यायचं बंधन त्याचेवर लावायला हवं होतं. परंतू न्यायालयानं असं केलं नसल्यानं तो बाइज्जत बरी झाला. त्यानंतर अशा बलत्कारात फक्त सातच वर्षाची शिक्षा होते. दुसरं काहीच होत नाही. असं समजणारी माणसं बलत्कार करीत राहिली. त्यातच दिल्लीचं निर्भया प्रकरण घडलं. उन्नावचं प्रकरण घडलं. खैरलांजी प्रकरण घडलं आणि आणखी बरीच प्रकरणं घडत आहेत. आज पाहिजे त्या प्रमाणात शिक्षेचं प्रावधान नसल्यानं गुन्हेगार चार वर्षाच्याही मुलींवर बलत्कार करीत आहेत. मग ती कोणत्याही जाती धर्माची असो. तसेच आज कार्यालयातील बॉस वा इतर माणसेही महिलांकडे तिरप्या नजरेनं पाहात आहेत. छळत आहेत. कारण आजच्या काळात पोलिसस्टेशन वा न्यायालयातून वा समाज घटकातून दादच मिळत नाही. ते सर्व घटक मौसेरे भाऊ असल्यागत वागत असतात. आजही स्त्रियांना घरी दारी दुय्यमच स्थान असून स्त्री जन्माचा आनंद व्यक्त होत नाही. मुली जन्मास आल्यास मुलगा जन्माची वाट पाहिली जाते. परंतू मुलींवर काही लोकं कुटूंबनियोजन करीत नाहीत. प्रसंगी चारचार मुली जन्मास घातल्या जातात पुत्रप्राप्तीसाठी. काही ठिकाणी तर भ्रूण तपासले जातात. मुलगी आहे का मुलगा हे पाहण्यासाठी. मुलगा असेल तर भ्रूण ठेवला जातो आणि ते भ्रूण मुलगी असेल तर सर्रासपणे नष्ट केलं जातं आजही. कारण कुटूंबात स्त्रीला दुय्यम स्थान असणं. आजही मुली घरची सगळी कामं करतात आणि मुलं ठोंब्यासारखी बसून राहतात. काही ठिकाणी नोकरी करणा-या मुली जरी असल्या, तरी घरी गेल्यावर त्यांना राबावंच लागतं. मात्र पुरुष घरी जाताच तो पाहिजे त्या प्रमाणात राबत नाही. ही वास्तविकता आहे.

ही असमानता आहे. ह्याच गोष्टी शाळेत वर्गावर्गात शिकवायची गरज आहे. मुले मुली समान आहेत. हाच मंत्र. तसेच जातीजातीत भेदभाव करु नये हाही मंत्र. परंतू ते न शिकवता आपण स्वतःच असं भेदभावानं वागत राहिलो. अनुसूचीत जाती जमातींना हिन लेखत राहिलो, तर विद्यार्थ्यांना कोणते धडे देणार! आपणच कार्यालयात बॉसच्या हो ला हो मिरवीत राहिलो तर ही समता कार्यालयात कशी प्रस्थापीत करणार. तसेच शाळेतही संस्थाचालकाच्या अत्याचाराचे आपण जर बळी ठरत असू तर आपण आपल्या विद्यार्थ्यांना काय न्याय देणार. तेव्हा आपणच बोले तैसा चाले, त्यांची वंदावी पावले असंच वागावं. घरी दारी अन् कार्यालयातही. तेव्हाच आपण ख-या अर्थानं समता प्रस्थापीत करु शकू. अन्यथा नाही. हे तेवढंच खरं आहे.

विशेष सांगायचं म्हणजे अनुसूचीत जाती जमाती प्रवर्ग व महिला वर्ग. यांना आज दुय्यम गणलं जात असून त्यांना समानतेच्या कक्षेत मोजलं जात नाही. फक्त वरवर दाखवलं जातं की आम्ही आपल्याला समान लेखतो. मानतो वैगेरे वैगेरे. परंतू प्रत्यक्षात तसं काहीही नाही. फक्त तो एक दिखावा आहे. हा दिखावेपणा जेव्हापर्यंत समाजातून वा समाजाच्या मनातून दूर होणार नाही. तोपर्यंत समाजातून या दोन्ही घटकाबद्दल आदर निर्माण होणार नाही आणि जेव्हा असा आदर निर्माण होईल. तेव्हाच ख-या अर्थानं समाज बदलेल. असे बलत्कारं घडणार नाही. अनुसूचीत जाती व जमातीवरही अत्याचार होणार नाही. कोणी अत्याचार करणार नाही. कोणी कोणाला जातीवाचक शिव्याही देणार नाही. असंच घडायला हवं. तेव्हाच सक्षम भारत घडवता येईल. न्यायालयानंही याबाबतीत पुढाकार घ्यावा. चालढकलपणा करु नये. जे संविधानात लिहिलं आहे की कायद्यासमोर सर्व समान आहेत. त्याचं पालन व्हावं. त्याचं जेव्हा पालन होईल. त्या गोष्टी जेव्हा अगदी बालवयापासून शाळेत शिकवल्या जातील. स्त्री मनात रुजविल्या जातील. तसेच अनुसूचीत जात जमातच नाही तर इतर तमाम सर्व जातीधर्माच्या व्यक्तींच्याही मनातून रुजतील. तेव्हाच हा स्त्री भेदाभेद, अनुसूचीत जाती भेदाभेद आणि इतर सर्व प्रकारचा भेदाभेद दूर होईल. जात नष्ट झाली नाही तरी... फक्त सक्षम देशासाठी आणि देशाला मजबूत करण्यासाठी माणसानं माणसाला माणसासारखं वागवायला हवं. माणसासारखं जगवायला हवं. मनात कुटील भाव न ठेवता. तसेच अहंकारी वृत्ती न ठेवता....

# कलियुगातील राम-सीता : डॉ. देव व डॉ. सरोज उपाध्याय

आधुनिक केसरी

आज कोपरगाव येथून येत असताना रोडच्या कडेने एक म्हातारं जोडपं जाताना दिसलं. माझी नेहमीची सवय असल्यामुळं मी त्या भिकारी दिसणाऱ्या जोडप्याला दुपार असल्यामुळं सहजच जेवणाचं विचारलं, तर ते 'नको' म्हणाले. मग मी त्यांना 100 रुपये देऊ केले, तर ते सुद्धा नको म्हणाले, मग पुढचा प्रश्न विचारला की तुम्ही असे का हिंडताय?'

मग सुरू झाला त्यांचा जीवनपट -

ते 2200 कि.मी. चा प्रवास करून आता द्वारकेला स्वतःच्या घरी परत चालले होते. त्यांनी सांगितले की माझे दोन्ही डोळे 1 वर्षांपूर्वी गेले होते आणि डॉक्टरनी सांगितले की ऑपरेशन करून उपयोग नाही मग माझ्या आईने डॉक्टरला भेटून ऑपरेशन करायला भाग पाडले व तिने श्री कृष्ण मंदिरात जाऊन देवाजवळ नवस केला की, 'डोळे परत आले तर माझा मुलगा पदयात्रा करत बालाजी व पंढरपूरला जाऊन परत द्वारकेला पायी येईल',

म्हणून मी आईच्या शब्दासाठी पदयात्रा करतोय, मग मी त्यांच्या बायकोविषयी विचारलं तर 'ती पण मला एकटं सोडायला तयार नव्हती व रस्त्याने मी तुम्हाला जेवण तयार करायला येते', म्हणून निघाली.

मग मी ते 25% हिन्दी 75% इंग्रजी बोलत असल्यामुळे शिक्षण विचारलं तर माझी बुद्धी ऐकून सुन्न झाली. त्यांनी लंडन येथे ऑक्सपोर्ड युनिव्हर्सिटीमध्ये 7 वर्षे खगोलशास्त्र यावर पीएच. डी. केलीय तर त्यांच्या बायकोने 'मनोविकार शास्त्र' या विषयावर लंडन येथेच पीएच. डी. केलीय (एवढं शिकून सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर गर्व नाही, नाही तर आपल्या कडे दहावी नापाससुद्धा छाती ताणून हिंडतो) एवढंच नाहीतर सी. रंगराजन (गव्हर्नर) यांचेबरोबर तसेच कल्पना चावला ह्यांच्याबरोबर काम व मैत्रेचे संबंध होते तसेच त्यांना मिळणारी मासिक पेन्शन ते एक अंध ट्रस्टला ते देऊन टाकतात. सध्या ते सोशल मीडियापासून लांब राहतात, रोडच्या कडेन जाणार प्रत्येक जोडपं भिकारी असतंच असं काही नाही. एखादा पुरुष हा आपल्या आईच्या शब्दासाठी प्रभू राम व्हायला तयार होतो आणि आपल्या पतीसोबत कोणी स्त्री सीता सुद्धा होते, म्हणूनच आज भेटलेली माणसे कलीयुगातील मी तर राम-सीताच समजतो.

आम्ही जवळ जवळ 1 तास त्यांच्याशी गप्पा मारल्या रोडवर उभा राहूनच. इतके प्रगल्भ विचार एकूण मन सुन्न झाले. अहंकार गळून गेला आणि वाटलं की आपण उगाचच खोट्या फुशारकीवर जगतो. त्या व्यक्तीच्या बोलण्यातील सहजपणा बघून असं वाटलं की आपण या जगात शून्य आहोत. हा पायी प्रवास बघून थक्क झालो. प्रवासाला निघून तीन महिने झाले आणि अजून घरी पोहचायला एक महिना लागेल. चौकशी अंती कळाले की, त्यांचे नाव डॉ. देव उपाध्याय व डॉ. सरोज उपाध्याय आहे.

**-प्रमोद आसने**

# सेक्सटिंग हे ऑनलाईन जगताचं भीषण वास्तव

सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**सेक्सटिंग हे ऑनलाईन जगताच भीषण वास्तव आहे. त्यातून ब्लॅकमेलिंग पासून ते शेअर झालेले नग्न फोटो आणि व्हिडीओ पॉर्न साईट्सना विकण्यापर्यंत अनेक गोष्टी होतात किंवा केल्या जातात. टिएजर मुलांमध्ये सेक्सटिंगचं प्रमाण प्रचंड आहे. एकमेकांच्या लैंगिक भावना चालवणारे मेसेजेस, फोटो आणि व्हिडीओ एकमेकांना गंमत म्हणून, थ्रिल म्हणून, पिअर प्रेशरने पाठवणं ही खूप कॉमन गोष्ट व्हायला लागली आहे. यात दरवेळी फॉर्वर्डेड फोटो किंवा व्हिडीओज असतील असं नाही. तर स्वतःचेही फोटो आणि व्हिडीओ पाठवण्याचं प्रमाण मोठं आहे. शिवाय हा असला तरुण वयाचा उन्माद आहे असं मानण्याचेही दिवस आता राहिले नाहीत.**

तुम्ही कधी ऐकलं आहे का सेक्सटिंग बद्दल..? सेक्सटिंग किंवा असं म्हणूया की, सेक्स टेक्सटिंग ज्याचा अर्थ आहे की, सेक्स किंवा तशा आशयाचे मेसेजेस आपल्या मोबाईलवरून दुसऱ्या व्यक्तीला पाठवणे. आजकालच्या डिजीटल युगात सगळं शक्य आहे. अगदी आपल्या पार्टनरसोबत डिजीटल उपकरणांच्या मदतीने सेक्शुअल गप्पा मारणेही... सेक्सटिंगला खरंतर व्हर्च्युअल सेक्सक्रीडा असं म्हणण्यास हरकत नाही. अगदी कामातून वेळ काढूनही लोक सेक्सटिंग करायला विसरत नाहीत. आजकालच्या युवापिढीत सेक्सटिंगच चलन वाढत आहे.

मोबाईल फोन, कॉम्प्युटर, टॅबलेट किंवा अन्य कोणत्याही डिजीटल डिव्हाईसने आपल्या पार्टनरशी केलेला सेक्स मेसेजेस, फोटो आणि व्हिडीओ पाठवणे किंवा मिळवण्याला सेक्सटिंग असं म्हणतात. जसं याच्या नावावरून स्पष्ट होतं की, सेक्सटिंग हा दोन शब्द म्हणजे सेक्स आणि टेक्स्ट मिळून तयार झालेला आहे. ज्याचा अर्थ सेक्सशी निगडीत मेसेजेस पाठवणे. आजकालच्या लोकांमध्ये सेक्सटिंग हा शब्द खूपच वेगाने लोकप्रिय होत आहे. ज्याप्रमाणे लोक आता सेक्सबाबत मोकळेपणाने बोलू लागले आहेत. त्याप्रमाणेच सेक्सटिंगच्या माध्यमातून लोक विना संकोच आपल्या सेक्सबाबतच्या इच्छाही जाहीर करत आहेत. सेक्सटिंगच्या माध्यमातून अधिकतर लोक नॉनव्हेज जोक्स किंवा सेक्सशी निगडीत जोक्स करून समोरच्या व्यक्तीला आपल्याकडे आकर्षित करतात.

त्या दोघांमधल्या गप्पा सहजच सुरु झाल्या. सुरुवातीला तो फेसबुकवर चालतो तसला 'हेल्दी फ्लर्टींग'चा प्रकार होता. त्यात तिलाही काही वावगं वाटलं नाही आणि त्यालाही... हळूहळू जनरल गप्पा पर्सनल व्हायला लागल्या. ती त्याच्या दिसण्याबद्दल, शरीराबद्दल उघड उघड बोलायला लागली. तिला त्याच्याशी बोलायला का आवडतं? कसं वाटतं? निरनिराळ्या संदर्भात त्याच्या सहवासाबद्दल तिला ओढ असते वैगरे वैगरे ती इतक्या उघडपणे बोलायला लागेल याचा अंदाज नसल्याने तोही मग मिळालेल्या संधीचा फायदा घ्यायला लागला. तिला कोणत्या फ्लेवरचा सुरक्षाकवच आवडतो इथपासून कुठल्या रंगांच्या अंतर्वस्त्रात ती अधिक खुलून दिसू शकेल इथपर्यंत सगळ्याच गप्पा चॅटिंग बॉक्समध्ये व्हायला लागल्या.

सुरुवातीला या सगळ्याची दोघांनाही गंमत वाटत होती. यात कुठेच शरीर सहभागी नसल्याने त्यांच्या मनातल्या व्यभिचाराशी संबंधित जाणिवांना ठेच पोचत नव्हती. मग एक दिवशी त्याने तिला नग्न बघण्याची मागणी केली. तोपर्यंत शरीराच्या मापांबद्दल इतकं चॅटिंग झालं होतं की, एकमेकांना बघण्याची उत्सुकता होतीच... तिनंही त्याची मागणी मान्य केली पण त्याचबरोबर त्यानंही नग्न होत व्हिडीओ चॅटिंग केलं पाहिजे असा आग्रह धरला. पहिल्या काहीशा अवघडलेल्या आणि भीतभीत झालेल्या व्हिडीओ कॉलिंग नंतर त्याची चटकच लागली. आपण हळूहळू कोणत्या दिशेने जातोय? याचा त्यांना अंदाजच येत नव्हता. वयाच्या एका विशिष्ठ वळणावर आयुष्यात काहीतरी थ्रिल पाहिजे म्हणून सुरु झालेला हा खेळ हळूहळू विकृत व्हायला लागला.




वेळीअवेळी त्याच्या डिमांड्स सुरु झाल्या आणि तो आपल्या सारखंच इतरही स्त्रियांशी सेक्सटिंग करत असणार या विचाराने ती अस्वस्थ झाली. तिला मिळत असलेलं 'प्लेजर' तिला कदाचित शेअर करावं लागत असेल या विचाराने ती वेडीपिशी झाली. हे सगळं कसं डील करावं हेही तिला आणि त्याला समजत नव्हतं. गंमतीगमतीत सुरु झालेला खेळ कुठे जाऊन पोहचेल? याचा कुणालाच अंदाज येत नव्हता. चालू प्रकार पुढे तसाच चालू ठेवणं दोघांनाही शक्य नव्हतं. नवे पार्टनर्स शोधावेत का? असे विचार मनात येत होते. सेक्सटिंगच्या व्यसनात आपण अडकलोय हेही समजत होतं, तर दुसरीकडे लागलेली चटक सोडवत नव्हती.

ही फक्त या दोघांची गोष्ट नाही. ही फक्त त्यांच्या आयुष्यात झालेली गडबड नाही, तर असे निरनिराळ्या वयोगटातले अनेक स्त्री-पुरुष यात अडकलेले असतात. सेक्सटिंग हे ऑनलाईन जगताच भीषण वास्तव आहे. त्यातून ब्लॅकमेलिंग पासून ते शेअर झालेले नग्न फोटो आणि व्हिडीओ पॉर्न साईट्सना विकण्यापर्यंत अनेक गोष्टी होतात किंवा केल्या जातात. टिएजर मुलांमध्ये सेक्सटिंगचं प्रमाण प्रचंड आहे. एकमेकांच्या लैंगिक भावना चालवणारे मेसेजेस, फोटो आणि व्हिडीओ एकमेकांना गंमत म्हणून, थ्रिल म्हणून, पिअर प्रेशरने पाठवणं ही खूप कॉमन गोष्ट व्हायला लागली आहे. यात दरवेळी फॉर्वर्डेड फोटो किंवा व्हिडीओज असतील असं नाही. तर स्वतःचेही फोटो आणि व्हिडीओ पाठवण्याचं प्रमाण मोठं आहे. शिवाय हा असला तरुण वयाचा उन्माद आहे असं मानण्याचेही दिवस आता राहिले नाहीत. चाळीशीच्या आतबाहेर असलेल्यांमध्ये देखिल सेक्सटिंगचं प्रमाण विलक्षण आहे.

हे सगळे प्रकार पूर्वी नव्हते आणि आताच सुरु झाले आहेत, असंही आपण म्हणू शकत नाही. लँडलाईन फोन्स आले, त्यानंतर अशा 'हॉट लाईन्स' होत्याच... जिथे समोरची स्त्री पुरुषांशी लैंगिक भावनांना उत्तेजना देणारं बोलत असे. सेक्सटिंग याच 'हॉट लाईन्स'चं आधुनिक आणि वेगवान रुप आहे. त्यामुळे इंटरनेटच्या क्रांतीनंतर या सगळ्या विकृत गोष्टी सुरु झाल्या वैगरे मानण्याचं कारण नाही. पूर्वी फक्त पुरुषांकरता आणि श्रवणापुरता मर्यादित असलेला हा मामला आता स्मार्टफोन सगळ्यांच्या हातात आल्याने जेण्डरलेस झाला आहे.

पण सेक्सटिंगची गुंतागुंत दिसते तितकी सोपी आणि सरळ नाही. यात अडकलेली माणसं मग ती कुठल्याही वयोगटाची का असेना अनेक धोक्यांना आमंत्रण देत असतात. यात मानसिक, भावनिक हानी तर होऊच शकते. पण सायबर क्राईम्सच्या जाळ्यात माणसं अडकण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

# नदी-नाल्यांचा पूर व रस्त्यांच्या खड्ड्यांपासून स्वत:ला सांभाळा

रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**राज्यात तीन दिवस पुन्हा मुसळधार पाऊस येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे राज्यातील लोकांनी सावधान रहाने गरजेचे आहे. पावसाचे विक्राळ रूप पहाता व यामुळे निर्माण होणारी पुरपरीस्थीती, रस्त्यांना पडलेले खड्डे यामुळे होणाऱ्या दुर्घटना यापासून सतर्क राहाने गरजेचे आहे. त्यामुळे जनतेने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नदी-नाल्याचा पुर, रोडचे खड्डे यापासून सावध रहावे जेनेकरून आपल्याला जिवीत हानी टाळता येईल. कारण "जान है तो जहान है"हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.**

सध्याच्या परिस्थितीत रस्त्यांचे खड्डे जीव घेणे झाले आहेत.पावसाळ्याची गंभीर परिस्थिती पहाता सर्वांनी स्वतःला सांभाळने गरजेचे आहे. यावर्षी पावसाने उग्र रूप धारण केल्याने राज्यात सर्वत्र पुरपरिस्थीती निर्माण होवून संपूर्ण महाराष्ट्र जलमग्न झाल्याचे दिसून येते. सध्या महाराष्ट्रासह संपूर्ण देशात पावसाच्या पाण्याने गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. महाराष्ट्रात अनेक नद्यांना महापुर आलेला असून संपूर्ण नद्या तुडुंब भरून धोकादायक स्थितीमध्ये आहेत. यामुळे अनेक धरण भरल्याने प्रत्येक धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात पुराने थैमान निर्माण केले आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पुरांमुळे अनेक गावांचा संपर्क तुटल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अती पावसामुळे ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांना मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढले आहे जनुकाय रोडचे खड्डे "मौत का कुवॉ" बनल्याचे दिसून येते. त्यामुळे जीवीत हानीसुध्दा होत आहे. गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत अवकाळी पाऊस व पावसाळ्यातील पाऊस यामुळे वीज कोसळुन आतापर्यंत तब्बल 157 लोकांचा बळी गेला ही सुद्धा गंभीर व चिंतेची बाब आहे. या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते.गेल्या तीन-चार दिवसांपासून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात सतत मुसळधार पाऊस सुरू असल्याने ग्रामीण भागातील लहान मोठ्या नदी-नाल्यांना महापूर आलेला आहे. विदर्भातील जुनापाणी गावाच्या शेजारी असलेल्या तलावाचा बांध फुटल्याने सर्वत्र हाहाकार उडाला. अशा अनेक घटना विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत अख्खा महाराष्ट्र पाण्याखाली आल्याचे दिसून येते. पावसामुळे दरवर्षी रोडला खड्डे पडतात यामुळे अनेक दुर्घटना होत असतात आणि यात अनेकांना आपला जीव सुध्दा गमवावा



लागतो ही बाब महाराष्ट्रासह संपूर्ण देश चांगल्याप्रकारे जानतो. राज्यात तीन दिवस पुन्हा मुसळधार पाऊस येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे राज्यातील लोकांनी सावधान रहाने गरजेचे आहे. पावसाचे विक्राळ रूप पहाता व यामुळे निर्माण होणारी पुरपरीस्थीती, रस्त्यांना पडलेले खड्डे यामुळे होणाऱ्या दुर्घटना यापासून सतर्क राहाने गरजेचे आहे. त्यामुळे जनतेने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नदी-नाल्याचा पुर, रोडचे खड्डे यापासून सावध रहावे जेनेकरून आपल्याला जिवीत हानी टाळता येईल. कारण "जान है तो जहान है"हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. कारण आपल्या पुर्वजांनी सांगितले आहे की आगीशी व पाण्याशी खेळु नये.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्यापासुन सावधान रहाने अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे नदी-नाल्याच्या पुरातुन जावु नये किंवा प्रवास करू नये व स्वतःचा जीव धोक्यात टाकू नये.आपल्या कामांना वेळ झाला तरी चालेल परंतु नदी-नाल्यांच्या पुरांशी मुजोरी करू नका व आपला जिव धोक्यात टाकू नका. आज अनेक क्षेत्रातील घरे पाण्याखाली आलेली आहेत.सिमेंट रोडच्या सुविधा झाल्यात,परंतु प्रशासनाचे ड्रेनेजकडे दुर्लक्ष झाल्याने शहर सुध्दा जलमग्न झाल्याचे दिसून येते. याचा त्रास सर्वसामान्यांना आज भोगावा लागतो आहे.अतिवृष्टीमुळे राज्यात आतापर्यंत 104 लोकांचा बळी गेला तर 189 प्राण्यांना आपला जीव गमवावा लागला.या व्यतीरीक्त जंगली प्राण्यांची सुध्दा पुरामुळे भयावह स्थिती निर्माण झाली आहे.अतिपावसामुळे राज्यातील 275 गावांना जबर फटका बसलेला आहे व काही गावांचा संपर्क सुध्दा तुटल्याचे दिसून येते. शहरात जिकडे-तिकडे सिमेंटीकरण झाले आहे. परंतु ड्रेनेजची सुविधा बरोबर नसल्याने शहरात सुध्दा जिकडे पहाल तीकडे आपल्याला पाणीच पाणी दिसून येत आहे.सध्याच्या परिस्थितीत पावसाच्या पाण्याने विक्राळ रूप धारण केल्याने पशुपक्षी व मानवजातीसाठी काळ बनल्याचे दिसून येते.नर्मदा नदीत एसटी डुबल्याने 13 लोकांचा मृत्यू झाला व 40 आताही बेपत्ता आहे. अशा भयावह घटना ऐकून अंगावर शहारे येतात. त्यामुळे सर्वांनीच नदी-नाल्याच्या पुरांपासुन व मुख्यत्वेकरून रस्त्याच्या जीवघेण्या खड्ड्यांपासुंन सावधान राहुन आपले कार्य करावे व "जान है तो जहान है" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारावा.

# नकाराचा सूर नको

प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

आधुनिक केसरी


**आजच्या काळात एकूणच समाजात वावरत असताना सर्वत्र आपल्याला नकाराचा सूर अधिक प्रमाणात दिसतो. याला सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडी कारणीभूत असलीतही; परंतु सतत नकारात्मक विचार केल्याचा परिणाम आपल्या कार्यशैलीवर होत असतो. याउलट घरातील महिलाची जर सकारात्मक विचारसरणी असेल तर ते घर आनंदानं भरलेलं दिसून येतं. त्याचबरोबर मुलांमध्येही सकारात्मकता वाढते.**

मात्र अनेक गृहिणींना न चा पाढा लावण्याची सवय असते. "आजचा दिवसच खराब आहे, नेहमी माझ्या सोबतच असे का होते?" अशा प्रकारचे विचार करण्याची अथवा बोलण्याची सवय अनेक जणींना असते. मात्र ही सवय चांगली नाही अशी सवय असल्यास ती ताबडतोब बदलण्याची गरज आहे. कारण दीर्घकाळ अशाच नकारात्मक पद्धतीने बोलत राहिल्यास आपल्यामध्ये देखील नकारात्मकता घर करून बसते. आणि त्याची आपल्याला माहिती नसते. म्हणून असे बोलण्यापूर्वी अथवा करण्यापूर्वी सावध व्हावे. आपल्या आजूबाजूची वयोवृद्ध माणसे नेहमी "शुभ बोल नाऱ्या" असे म्हणत असतात. यामागे आपण फक्त चांगले बोलावे असे नसून ऐकणाऱ्यालाही चांगले वाटावे आणि त्यामुळे घरातील वातावरणही आनंदी रहावे हा उद्देश असतो.

नेहमी नकारात्मक विचार आणि तक्रार करणाऱ्या व्यक्तींपासून त्यांचे परिचित, मित्र आणि नातेवाईकदेखील अंतरावर राहू लागतात. याचा अनुभव अनेकांनी घेतलाही असेल. कारण रोजच्या कंटाळवाण्या आणि त्याच गोष्टीमुळे वातावरण सुस्त आणि तणावग्रस्त बनू लागते. अनेकजणींना मैत्रिणींसमोर नेहमीच छोट्या मोठ्या तक्रारी करत राहण्याची सवय असते. "या कामवाल्या बायांनी तर कंटाळवले आहे. जेव्हा पहावं तेव्हा न सांगता सुट्टी घेतात, महागाई किती आहे, किती घाण वातावरण आहे अशा प्रकारची वाक्य सतत ऐकणे आणि त्या गोष्टींबद्दल सतत तक्रार करत राहणे हे ऐकणाऱ्यालासुद्धा खरोखर कंटाळवाणे वाटते. अशा तक्रारी नेहमीच कुणी ऐकूण घेत नाही.

अशा वेळी आपण काय कराचे? काही महिलांचा मूड छोट्या-छोट्या गोष्टीमुळे चटकन बिघडतो. रस्त्यात ट्रेफिक जाम झाले किंवा घरी मोबाईल विसरला, कामावर जाण्यासाठी उशीर झाला या गोष्टीदेखील त्यासाठी पुरेशा ठरतात. तज्ज्ञांच्या मते अव्यवस्थित राहण्याची सवयदेखील मूड खराब करण्याला कारणीभूत ठरते. रहदारीसाठी उपाय घरातून थोड लवकर बाहेर पडावे. आपल्या सर्व वस्तू नेहमी योग्य जागी ठेवाव्या. घरातील कामे लवकर आटपून घ्यावी. उठण्याची वेळ निश्चित झाली तर इतर सर्व कामे अगदी वेळेवर पार पडतात. आणि अशा छोट्या त्रासाला आपण बऱ्याच प्रमाणात लांब ठेवू शकतो. दुसऱ्या व्यक्तीमुळे मूड खराब होत असेल तर एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी. आपल्याप्रमाणे जग चालत नसते तर आपल्याला स्वतःला परिस्थितीनुसार बदल करावे लागतात. सुरुवातीपासूनच मनाची तयारी करावी की मूड खराब करणाऱ्या व्यक्ती आपल्याला पालोपावली भेटेल. अशा व्यक्तींपासून त्रास न करून घेण्याचा सोपा उपाय म्हणजे त्यांच्या गोष्टी मनावर घेऊच नये. सकाळी उठल्यानंतर स्वतःलाच म्हणावे, की आजचा दिवस खूप चांगला जाणार आहे. हे छोटे छोटे नियम पाळले तर आपण नक्कीच खूप चांगला अनुभव घेऊ शकतो.

सतत तक्रारीच्या सुरातल्या गोष्टी ऐकल्यामुळे आपल्या विचार करण्याची प्रक्रिया हळूहळू नकारात्मकतेकडे वळू लागते. म्हणूनच शक्य तेवढ्या या गोष्टींपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा.



# महाराष्ट्राचे डबल इंजिन सरकार व ओबीसींचे प्रश्न



प्रा.श्रावण देवरे
संपर्क क्र. 8830127270

आधुनिक केसरी

**सुपर पॉवर शक्ती असलेले शिंदे-फडणवीसांचे डबल इंजिन सरकार महाराष्ट्रात नव्यानेच स्थापन झाले आणी आम्हाला नको तेवढा मोठा आनंद झाला. सरकार अस्तित्वात येत असतांनाच आम्हाला या सुपर पॉवरची प्रचिती आली. ज्या पद्धतीने सुप्रिम कोर्ट, संविधान व राज्यपाल या तिघा कॉन्स्टिट्युशनल सुपर पॉवर्सना खिशात टाकून नवं सरकार स्थापन करण्यात फडणवीसांना यश आलं, ती पद्धत पाहता कोणाही भाबड्या माणसाला फडणवीसांच्या सुपर पॉवरची खात्री यायलाच पाहिजे. आम्ही ओबीसी एक नंबरचे भाबडे! आम्हाला तर खात्रीच झाली व आनंही झाला! आनंद होण्याची दोन कारणे आहेत- पहिले कारण हे आहे की, कोणतेही नवे सरकार अस्तित्वात येत असतांना आपली आयडेंटी सिद्ध करण्यासाठी शपथविधीनंतर लगेच मोठे निर्णय घेत असते. म्हणजे उदाहरणच द्यायचे तर कम्युनिस्ट पक्षाचे देता येईल!**

कम्युनिस्ट पक्ष जेव्हा भांडवलदारी पक्षाला पराभूत करून आपलं नवं सरकार स्थापन करतो, तेव्हा ते सरकार आपली कम्युनिस्ट आयडेंटी सिद्ध करण्यासाठी कष्टकर्‍यांच्या हिताचे नवे कार्यक्रम घोषित करीत असते. पश्चिम बंगाल, केरळमध्ये हे आपल्याला पाहायला मिळालेले आहे. कष्टकरी वर्गात सर्वात जास्त संख्येने छोटे शेतकरी व औद्योगिक कामगार असतात. त्या राज्यांमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे सरकार स्थापन होताच जमिनिचे फेरवाटप, कामगार कायद्यात सुधारणा वगैरे कार्यक्रम ताबडतोब हाती घेण्यात आलेत.
मविआ सरकारमध्ये हिंदूत्व धोक्यात आलेलं होतं, आणी ते वाचवण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी व त्यांच्या कॉम्रेड( ?) साथीदारांनी मंत्रीपदाला लाथ मारून उठाव केला व कट्टर हिंदूत्ववादी असलेल्या भाजपाबरोबर नवं सरकार स्थापन केलं! आता हे सरकार हिंदूत्वासाठी म्हणजे हिंदू लोकांसाठी काहीतरी क्रांतीकारक कार्यक्रम हाती घेतील या आशेने आम्ही खूष झालो. हिंदूंमध्ये सर्वात मोठी संख्या म्हणजे ओबीसीच! तेव्हा ओबीसींच्या हिताच्या काही घोषणा होतील, अशी आमची भाबडी आशा! म्हणजे ओबीसी महामंडळाला पाच हजार कोटींचा निधी देतील, किंवा ओबीसींच्या महाजोतीला किमान ऑफिससाठी चांगली जागा व कर्मचारी तरी देतील.
नवं सरकार आल्याने आनंद व्हायचं दुसर कारणही असेच महत्वाचं आहे. मविआ सरकार असतांना बांटिया आयोगाने आडनावावरून ओबीसी जाती ओळखण्याचा गावंढळपणा केला! या गावंढळपणाला कसून विरोध करणारे फडणवीस हे पहिले राजकीय नेते! तेव्हा ते विरोधी पक्षनेते होते, आता ते उपमुख्यमंत्री आहेत! शपथविधी झाल्यानंतर पहिली शासकीय बैठक ओबीसीच्या मुद्द्यावर घेतली. यावरून फडणविस हे खरोखर ओबीसीच्या मुद्द्यावर गंभीर आहेत, असे आमच्या ओबीसी भाबडेपणाला वाटते. या बैठकीला एकही ओबीसी संघटना नव्हती, कुणीही ओबीसी नेता या बैठकीत नव्हता, किमान राज्यमागास आयोगाचा अध्यक्ष वा बांटिया आयोगाचा अध्यक्ष तरी या बैठकीत होता काय? सर्वात तातडीचा प्रशन होता तो बांटिया आयोगाच्या कार्यपद्धतीचा! कारण या कार्यपद्धतीमुळे एकूणच ओबीसींची लोकसंख्या कमी करण्याचा घाट घातला गेला आहे, अशी टिका खुद्द फडणविसांनी विरोधीपक्षनेता असतांना केली होती. त्यामुळे उपमुख्यमंत्री म्हणून फडणवीस ओबीसी प्रश्नावर घेतलेल्या पहिल्याच बैठकीत काहीतरी उपाययोजना करतील, असे आम्हाला वाटले होते. आडनावावरून जाती शोधण्याचा गावंढळपणा बांटिया आयोग का करीत आहे, याची कारणमिमांसा मी 19 जूनच्या माझ्या "सुप्रीम कोर्टाकडून आणखी एक लाथ ओबीसींच्या कमरेत" या लेखात केली आहे. लेखाचा एक पॅरा पुढीलप्रमाणे-
"1) या षडयंत्रकारी कामचूकारांमध्ये सर्वात वरचा नंबर लागतो आहे तो अजित पवारांचा! "ना रहेगा बास ना बजेगी बांसूरी" हे त्यांचे घोषवाक्य! डेटा गोळा करणार्‍या बांटिया आयोगाला पैसेच दिले नाहीत तर, तो अचूकपणे शास्त्रशूद्धपणे कामच करू शकणार नाही. परंतू आयोग नियुक्त केला आहे, तर काहीतरी काम करावेच लागेल, म्हणून मग कसातरी थातूर मातूर डेटा गोळा करून चूकीचा अहवाल सादर करायचा व सुप्रिम कोर्टाची लाथ बसल्यावर चेकाळत बसायचे! असा हा नवटंकीचा नाट्यप्रयोग राज्य मागास आयोगापासून समर्पित आयोगापर्यंत चालत येत आहे. सुप्रिम कोर्टाची लाथ ना शासनाच्या कमरेत बसते आहे ना आयोगांच्या कमरेत! सुप्रिम कोर्टाची लाथ ओबीसी जनतेच्या कमरेत बसते आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण संपूष्टात आले तर त्याचा डायरेक्ट फायदा आपल्या मराठा जातीला होतो, हे अजित पवारांना माहित असल्याने ते या षडयंत्राचे म्होरके बनलेले आहेत."
उपरोक्त पॅरामध्ये मी स्पष्टपणे लिहीलेले आहे की, बांटिया आयोगाला डेटा गोळा करण्याचे काम शास्त्रशूद्धपणे व अचूकपणे करताच येऊ नये म्हणून आयोगाला पैसाच द्यायचा नाही, असे ते षडयंत्र होते. दलित-ओबीसींचे शत्रू म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या अजित पवारांनी हे षडयंत्र यशस्वीपणे पार पाडले. परंतू फडणवीस तर उठता-बसता ओबीसी-ओबीसी अशी जपमाळ करीत असतात. त्यामुळे उपमुख्यमंत्री म्हणून घेतलेल्या पहिल्याच ओबीसी बैठकीत ते बांटिया आयोगासंदर्भात पुढील कार्यक्रम घोषित करतील असे आम्हाला वाटले होते-

**(पुर्वार्ध)**

1) बांटिया आयोगाच्या अहवालाने ओबीसींची लोकसंख्या 37 टक्के दाखविलेली आहे, त्यावरून हे सिद्ध होते कि या आयोगाने चूकीची व अशास्त्रीय पद्धत अवलंबलेली आहे. बांटिया आयोगाचा हा थातुर-मातूर अहवाल ताबडतोब फेटाळला पाहिजे.
2) पक्षपाती, आरक्षणविरोधी व ओबीसींचे शत्रू म्हणून या पुर्वीही सिद्ध झालेल्या बांटियाची हकालपट्टी करून त्यांच्या जागी ओबीसी कॅटेगिरीतील अभ्यासू व निवृत्त न्यायधिशांची नियुक्ती केली पाहिजे.
3) आडनावावरुन जात शोधण्याच्या कामाला प्रतिबंध घातला पाहिजे.
4) डेटा गोळा करण्यासाठी शास्त्रशूद्ध व अचूक पद्धत अबलंबायची असेल तर त्यासाठी संबंधित शासकीय कर्मचारी-अधिकारी, त्या त्या भागातील ओबीसी संघटनांचे पदाधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडून आलेले आजी-माजी ओबीसी लोकप्रतिनिधी यांची समन्य समिती स्थापन करणे.
5) या प्रमाणे विविध जिल्ह्यातील समन्वय समित्यांचे संयुक्त केडरकॅम्प घेउन त्यांना डेटा गोळा करण्याची कार्यपद्धती समजावून सांगणे.
6) याप्रमाणे केडर कॅम्प, स्टेशनरी, वाहने व इतर साधन सामुग्रीसाठी लागणारा निधी 435 कोटी रूपयांचा आहे, असा आराखडा राज्यमागास आयोगाने तयार केलेला आहे.
7) डेटा गोळा करणार्‍या जिल्हानिहाय समन्वय समितीत जे लोकप्रतिनिधी काम करतील त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्राप्रमाणे मानधन दिले पाहिजे. हे मानधन प्रत्येकी किमान 5000, 7000 व 10,000 रूपये इतके असले पाहिजे. अशाच प्रकारचे मानधन कॉम्पुटर ऑपरेटर, सॉफ्टवेअर इंजिनिअर व इतर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त केलेल्या तज्ञ कर्मचारी वर्गाला दिले पाहिजे.
8) बांटिया आयोगाला शास्त्रशूद्ध पद्धतीसाठी मार्गदर्शन करणारी व त्याबरहुकूम काम होत आहे की नाही, हे पाहण्यासाठी राज्यस्तरीय ओबीसी अभ्यासकांची सल्लागार समिती स्थापन केली पाहिजे.
9) अशाप्रकारे डेटा गोळा करण्याचे काम झाले तर त्याचा एकूण खर्च 435 कोटी रूपये होणारच!
10) फडणवीसांनी हा निधी आयोगाला ताबडतोब मंजूर केला पहिजे. अजूनही वेळ गेलेला नाही. काही निवडणूका विदाऊट ओबीसी आरक्षण होत असतील तर होऊ द्या, मात्र जो डेटा गोळा होईल तो शास्त्रूद्धपणे व अचूकपणे गोळा झाला पाहिजे, जेणेकरून तो सुप्रिम कोर्टात टिकेल व पक्के मजबूत असे कायमस्वरुपी आरक्षण ओबीसींना मिळाले पाहिजे.
अजूनही वेळ गेलेली नाही. शिंदे-फडणवीसांच्या डबल इंजिन सरकारने गतिमान होऊन ताबतोब 435 कोटी रूपयांचा निधी या समर्पित आयोगाला देतील, अशी आम्ही अपेक्षा बाळगतो. जर हे सरकार याप्रमाणे काही उपायोजना करून ओबीसींना न्याय देणार नसेल तर ओबीसी म्हणून आपण काय उपाययोजना केली पाहिजे व तातडीचा कोणता कृतीकार्यक्रम हाती घेतला पाहिजे, याची चर्चा आपण उद्याच्या उत्तरार्धात करू या! तोपर्यंत जयजोती, जयभीम, सत्य की जय हो!



# शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये आनंदी जीवनशैलीचे पैलू रुजविण्याची गरज



भरत कोळी
बॉक्सिंग प्रशिक्षक, धुळे

आधुनिक केसरी

**आजच्या २१ व्या शतकातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील शालेय स्तरावरील मुलांच्या बाबतीत विचार केला तर आनंदी व हसत राहणारी मुलं आज मोबाईलच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात हरवली की काय असं चित्र सध्या डोळ्यासमोर नेहमीच उभं राहतं. कोरोनामुळे शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये बऱ्याच प्रमाणात शारिरीक व मानसिक समस्या निर्माण झाल्यात. त्यात ऑनलाईन शिक्षणाला प्रमाणापेक्षा प्राधान्य दिल्यामुळे ताणतणाव वाढीस लागला. ऑनलाईन शिक्षणाचा वाढता अवलंब, त्यांच्या पाठीवरील दप्तराचे वाढते ओझे, शालेय वयाचा विचार न करता पुस्तकाचा अति बोझा, त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे सतत होणारे दुर्लक्ष आणि कला व क्रीडा गुणांना दिलेला दुजोरा अशा अनेक छोट्या-छोट्या गोष्टीमुळे आजच्या शालेय मुलांमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्याच्या समस्या मोठया प्रमाणात भेळसावत आहेत.**



त्यातल्या-त्यात ग्रामीण भागातील शालेय स्तरावरील मुलांपेक्षा शहरी भागातील मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या समस्याचा आलेख वाढता आहे. ताणतणाव, लठ्ठपणा व इतर अशा अनेक समस्यांनी त्यांना घेरलेलं असल्याने भविष्यातील आरोग्यावर प्रश्न चिन्ह निर्माण होतो, त्याचबरोबर त्यांच्याकडून पालकांनी केलेली गुणांची अतिअपेक्षा ही आजच्या शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीस मोठा अडथळा अर्थात ताणतणाव निर्माण करू शकते हे समजून घेणं आजच्या धावपळीच्या युगात गरजेचं आहे. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना गुणांक धारित व अपेक्षांच्या ओझ्यातून मुक्त करण्याची गरज आहे आणि आनंदी जीवनशैलीची एक सुदृढ व्यवस्था आपल्या समाज माध्यमातुन त्यांच्यासाठी झाली पाहिजे असं मला वाटतं कारण आपण जोपर्यंत त्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात सक्षम होण्यास बळ देत नाही तोपर्यंत त्यांच्या आयुष्यात आनंदी जीवनशैलीचे पैलू रुजणार नाही असो पण "भविष्यात आरोग्याचे प्रश्न हे जगाच्या पाठीवरील सर्वात मोठं आव्हान आपल्या समोर असेल" हे या दोन वर्षांतील कोरोना महामारीने आपल्याला दाखवून दिले आहे यात अजिबात शंका नाही, खरंतर आजच्या धावपळीच्या जीवनात आनंदी जीवनशैलीचे पैलू रुजविण्यासाठी नेहमीचं सकारात्मक दिशेने वाटचाल केली पाहिजे हे आपण सध्या विसरत आहोत ही सर्वात मोठी खंत मला वाटते.
आज मुलांच्या आरोग्याकडे आपलं होणारं सततचे दुर्लक्ष हे त्यांना सक्षम बनविण्याच्या एवेजी मानसिक व शारीरिक असक्षम बनवत आहोत हे लक्षात घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास कसा साधला जाईल हे समजून घेण्याची गरज आहे. "मुलांचा सर्वांगीण विकास करणं ही फक्त शाळेची जवाबदारी नाही तर आपली पण मूलभूत गरज आहे", आज शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाढता लठ्ठपणाचा आजार म्हणजे भविष्यातील भारतीय युवा वर्गाची वाटचाल ही असुदृढतेकडे जाणारी असेल हे पालकांनी लक्षात घेऊन मुलांच्या भविष्यातील आरोग्याबाबतील योजना आखावी,अगदी लहानपणापासूनचं त्यांच्याकडून अति अपेक्षा करणं म्हणजे तपस्वी अशा सूर्याला हात लावण्यासारखेचं आहेचं" हे जरा लक्षात घ्यावं, आपल्या मुलांना स्वतःचे आरोग्य रोजच्या व्यहारातील जीवनशैलीत कसं टिकवून ठेवता येईल हे शिकण्यासाठी व याचा अनुभव घेण्यासाठी पालक वर्गाने त्यांना मैदानावर खेळण्यास प्राधान्य ददेणे महत्वाचे आहे, जेणेकरून त्याच्या शारीरिक क्षमतेचा विकास होईल, आज शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या जीवनशैलीचा अभ्यास केला तर असं लक्षात येतं की त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्य हे दिवसेंदिवस असक्षम होत सर्वांगिण विकासाचे गणित बिघडत चालेलं आहे, त्यामुळे मुलांमध्ये शारीरिक व मानसिक क्षमता विकसित होईल असं वातावरण त्यांच्या अवती-भवती निर्माण होण्यास वाव द्या.
मुलांना दररोज १ तास मैदानावर खेळण्यासाठी वेळ देणे महत्वाचे आहे, त्यामुळे क्रीडा कौशल्य आत्मसात होईल शारीरिक क्षमतेचा विकास होईल आणि आपण यासाठी हातभार लावला पाहिजे ही आपली पालक म्हणून मूलभूत जवाबदारी आहे. आनंदी जीवनाच्या प्रवासात अनेक असे प्रसंग त्यांच्या आयुष्यात येत राहतील जे त्यांना ताणतणाव निर्माण करतील पण अशा प्रत्येक प्रसंगावर मात करण्याची वृत्ती त्यांच्या अंगी बाणवली पाहिजे ह्या हेतूने त्यांना मैदानावर लढू देण्याचे बळ आपल्याकडून त्यांना लाभू देणे अपेक्षित आहे. शाळेच्या प्रांगणात जेव्हा ही शालेय मुलं खेळतात तेंव्हा त्यांचा आनंद हा गगनात मावेनासा झालेला नेहमीच दिसतो, मग यावरूनच विचार करा की मैदानात किती शारीरिक व मानसिक सक्षमतेची ताकद दळलेली आहे, विकासाच्या प्रक्रियेत आपण अग्रेसर जरी असलो तरी आपण मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे शासनाकडून व आपल्या समाजाच्या काही नकारात्मक भूमिकेमुळे त्यांच्या सर्वांगिण विकासाकडे दुर्लक्ष करत असतो. आज प्रत्येक शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा कौशल्य ही आरोग्याच्या दृष्टीने रुजली गेली पाहिजे ह्या हेतूने त्यांना मैदानावर सक्षम होण्यास मदत करा, त्यांना अपेक्षांच्या ओझ्या खाली न ठेवता सकारात्मक परिणाम करणारी एक प्रणाली त्यांच्या आयुष्यात विकसित करा म्हणजे मुलांच्या बाबतीत भविष्यातील आरोग्याची चिंता पालक म्हणून तुम्हाला अजिबात राहणार नाही, शालेय जीवनात आनंदी ठेवण्यासाठी क्रीडा वातावरण निर्माण होणं गरजेचं आहे ज्यामुळे भारतीय समाज बलशाली होईल.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद



नागपूर : एकल ग्राम संघटन महिला समितीतर्फे आयोजित मासिक सभेत दि.१६ रोजी केंद्रीय महिला समिती सेवावृत्ती प्रमुख सविता गुप्ता, केंद्रीय महिला प्रभारी, उपाध्यक्ष पी-८ प्रभाग, नागपूर विभाग सचिव दिपाली गाडगे तसेच नागपूर एकल ग्राम संघटन अध्यक्षा अरुणा पुरोहित आणि (अनक्षेत्र फाउंडेशनच्या प्रमुख) यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. नंतर आलापल्ली आणि कमलापूर येथील पुरग्रस्तांसाठी एकल महिला समितीच्या सदस्यांनी एकत्रित केलेले भरपूर कपडे, भांडे, ब्लॅंकेटस, चादरी तसेच अन्नक्षेत्र फाउंडेशन तर्फे २०० राशन किटसची मदत तातडीने पाठविण्यात आली.



# पूर्णा नदीला आलेल्या पुरामुळे जळगाव जामोद-नांदुरा मार्ग वाहतुकीसाठी बंद

## नवीन पुलाचे काम अर्धवट स्थितीत असल्याने प्रवाशांचे होत आहेत हाल

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**माणेगाव :** काल रात्रीपासून बुलढाणा, अकोला जिल्ह्यात झालेल्या दमदार पावसामुळे 18 जुलै रोजी पुर्णा नदीला पूर आला असून येरळी, माणेगाव या मार्गावरील पुर्णा नदीवर ब्रिटिश कालीन पुल पाण्याखाली गेल्यामुळे जळगाव जामोद-नांदुरा मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला आहे.

रात्रीपासूनच पावसाची संततधार चालू असून आज दिवसभरही पावसाची रिपरिप चालूच होती. त्यामुळे छोटेमोठे नदी, नाले काठोकाठ भरून वाहत आहे. पुर्णा नदीचा उगम मध्य प्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील सातपुड्याच्या डोंगरातून झाला असून, त्या भागात पावसाने दमदार हजेरी लावल्याने पुर्णा नदीला पूर आला असून पुलावरून दोन ते तीन फुट पाणी वाहत आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिला तर पुर्णा नदीला मोठा पूर होण्याची दाट शक्यता आहे. पुराचे पाणी मोठ्या वेगात वाढत असून पूर्णा नदीचे पात्र दुथडी भरून वाहत आहे.

माणेगाव येरळीच्या मध्ये असलेला हा पुल ब्रिटिश कालीन असून 2006 मध्ये झालेल्या पुरात या पुलाचा काही भाग पुरात वाहून गेला होता. त्यानंतर डागडुजी करून पुन्हा त्याच पुलावरून वाहतूक सुरू करण्यात आली होती. पुर्णा नदीवर दहा ते बारा वर्षापासून जीगाव प्रकल्पाचे काम चालू आहे. त्याचाच एक भाग म्हणून माणेगाव येथील पुर्णा नदीवर जुन्या पुलाच्या बाजूला नविन पुलाचे काम बऱ्याच वर्षांपासून सुरू आहे. पण अजूनही पुलाचे काम अर्धवट स्थितीत आहे. स्थानिक आमदार, खासदार यांच्या राजकिय अभावामुळे पुलाचे कार्य अजूनही पुर्णत्वास गेले नाही. हा नवीन पुल जर पुर्ण झाला असता तर प्रवाशांचे हाल झाले नसते. पुलावरून पाणी असल्याने प्रवाशांना मोठे अंतर पार करत माहुली पुलावरून आणि धोपेश्वर येथुल पुलावरून जावे लागत आहे. नवीन पूल झाला असता तर प्रवाशांची अशी गैरसोय झाली नसती. त्यामुळे लवकरात लवकर हा नवीन पुल पुर्ण होणे गरजेचे आहे.

# राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारताचे ३२२ सदस्यीय संघाची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन (IOA) ने २८ जुलै २०२२ पासून बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या राष्ट्रकुल (CWG) स्पर्धेसाठी २१५ खेळाडू आणि १०७ अधिकारी तसेच सपोर्ट स्टाफसह ३२२ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. हा संघ २०१८ राष्ट्रकुल कामगिरीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करेल, जिथे ते पारंपारिक पॉवरहाऊस ऑस्ट्रेलिया व इंग्लंडच्या मागे तिसरे स्थान मिळवले.

संघाची अधिकृत घोषणेनंतर आपले विचार मांडताना राजीव मेहता, सरचिटणीस, IOA, म्हणाले, आम्ही आमच्या आतापर्यंतच्या सर्वात मजबूत पथकांपैकी एक राष्ट्रकुल स्पर्धेसाठी पाठवत आहोत. आपला शुटिंगचा संघ खुप मजबूत आहे. ही स्पर्धा जागतिक दर्जाची, चुरशीची असेल. आमच्या खेळाडूंनी चांगली तयारी केली आहे, ते तंदुरुस्त आहेत. आम्ही त्यांना खूप खूप शुभेच्छा देतो.

नीरज चोप्रा व्यतिरिक्त संघातील काही प्रमुख नावांमध्ये ऑलिम्पिक पदक विजेते पी.व्ही. सिंधू, मीराबाई चानू, लोव्हलिना बोरगोहेन, बजरंग पुनिया व रवी कुमार दहिया यांचा भारतीय संघात समावेश आहे. गतविजेत्या राष्ट्रकुल चॅम्पियन मनिका बत्रा, विनेश फोगट, हिमा दास व अमित पंघल हे भारतीय चमूत आहेत. राजेश भंडारी, उपाध्यक्ष, भारतीय बॉक्सिंग फेडरेशन (BFI), यांची संघाचे शेफ डी मिशन म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. टीम इंडिया १५ क्रीडा प्रकारामध्ये तसेच पॅरा स्पोर्ट्स ४ प्रकारच्या स्पर्धात सहभागी होणार आहे. भारत बॉक्सिंग, बॅडमिंटन, हॉकी, वेटलिफ्टिंग, महिला क्रिकेट (राष्ट्रकुलमध्ये पदार्पण) व कुस्ती यांसारख्या पारंपारिकपणे क्रीडा प्रकारामध्ये चांगली कामगिरी करेल तसेच ॲथलेटिक्स, सायकलिंग, जलतरण व टेबल टेनिसमधील भारतीय संघही मजबूत आहेत व आव्हानासाठी सज्ज आहेत.

BIRMINGHAM 2022 commonwealth games

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त • पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत • सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीश देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122



# संततधार पावसामुळे खरिपाची पिके पडू लागली पिवळी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या आठ दिवसापासून तालुक्यात सततधार पावसाची दमदार हजेरी लागली असल्याने कपाशी, तुर या पिकात पाणी साचल्याने आता पिके पिवळे पडु लागल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असुन गेल्या आठ दिवसापासून सुर्य दर्शन झाले नाही. रोजच्या रिमझिम पावसामुळे आता खरिपातील पिके वाया जाते कि काय हि चिंता आता शेतकरी करू लागले.

जूनमधील दमदार पावसाच्या सरीवर शेतकऱ्यांनी मोठ्या हिमतीने खरिपाची पेरणी आटोपली. त्यानंतर गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने पिके पाण्याखाली गेली आहेत. पिकांमध्ये पाणी साचल्याने पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्याने शेतात महागडी खते, बी-बियाणांवर मोठा खर्च करत पेरणी केली होती. यात कापूस, मूग, तुर पिकासोबत सोयाबीन या पिकाची पेरणी मोठ्या प्रमाणात झाली. पाणी साचलेल्या ठिकाणी बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने अशा ठिकाणी योग्य औषधाची आळवणी किंवा फवारणी घेऊन उपायोजना कराव्यात, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी संदिप शिरसाट दिली आहे.

तसेच सततधार पावसामुळे खरिपाचे पिकाचा पंचनामा करून शेतकऱ्यांना सरकारने मदत करण्याची मागणी स्वभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष ज्ञानदेव मुळे यांनी केली आहे.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे | आरोग्य | शिक्षण | पर्यावरण | सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार | सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम

सुरेश सिरसीकर
संस्थापक/अध्यक्ष

रविंद्र बनकर
उपाध्यक्ष

अपर्णा मेहता
सचिव
अधिक माहितीसाठी : 7020577693 | holdinghands092@gmail.com

# बँकेच्या सभासदांना 10 % लाभांश जाहीर : किशोर शितोळे

## देवगिरी बँकेची 39 वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देवगिरी बँकेची 39 वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि.17 जुलै 2022 रोजी संपन्न झाली. सभेची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सभेचे अध्यक्षस्थान भूषविले. सभेच्या सुरुवातीस बँकेचे सभासद व कर्मचाऱ्यांच्या दहावी व बारावीच्या गुणवंत पाल्यांचे सत्कार करण्यात आला. बँकेने सन 2021- 22 या आर्थिक वर्षात उत्तम बँकिंग सेवा देत देवगिरी बँकेने आजवरचा सर्वाधिक रु.34.19 कोटींचा नफा कमविला असून, मार्च 2022 अखेर बँकेचा एकूण व्यवसाय रु.2123.00 कोटी एवढा असल्याचे बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सांगितले. तसेच अहवाल वर्षात बँकेने रु.2000.00 कोटींचा टप्पा पार केला असून, बँकेची रु.3000.00 कोटीच्या व्यवसायाकडे वाटचाल सुरू आहे. हे केवळ बँकेच्या सभासद, कर्मचारी व ग्राहकामुळेच शक्य झाले आहे असे बँकेचे किशोर शितोळे यांनी आवर्जून नमूद केले. शितोळे यांनी बँकेच्या व्यवसाय वाढीच्या विविध योजनांची माहिती दिली. बँकेच्या कामकाजाचा आढावा सांगितला. यावेळी बोलताना बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सभासदांना आवाहन केले की, प्रत्येक सभासदाने आपल्या कुटुंब व मित्र परिवाराचे बँकेत खाते उघडावे, कर्ज घ्यावे,



ठेवी ठेवाव्या व देवगिरी बँक ही कुटुंबाची बँक करावी. बँकेने विविध सामाजिक कार्य केले, बोअरवेल पुनर्भरण, बारव पूर्णजीवन, ऑनलाइन आरोग्यम धनसंपदा आरोग्य जनजागृती, देवगिरी बँक फिटनेस क्लब इत्यादी उपक्रम राबविले. तसेच बँकेच्या व्यवसाय वाढीसाठी शाखा प्रतिनिधी अधिकारी यांची नियुक्ती, स्वतंत्र कॉल सेंटरची स्थपना, अद्ययावत वेब साईट, डोअर टू डोअर मार्केटिंग, थकीत कर्ज खात्यांच्या वसुलीसाठी सक्षम यंत्रणा, नव उद्योजक विकास कार्यक्रम व प्रथितयश उद्योजकांसोबत टॉक-शो, इत्यादि उपक्रम सुरू केल्याबद्दल अनेक सभासदांनी संचालक मंडळाचे कौतुक केले व ह्या उपक्रमाबद्दल पत्राद्वारे शुभेच्छा चा वर्षाव केला.

संचालक मंडळाने, सभासदांना मार्च 2021 अखेर संपलेल्या आर्थिक वर्षासाठी रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने सभासदांना 10% प्रमाणे लाभांश वितरित केला. याबद्दल उपस्थित सर्वांनी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व समस्त संचालक मंडळाचे आभार मानले. या प्रसंगी बँकेचे माजी संचालक रामभाऊ अप्पा गावंडे, हिम्मतराव गवळी, देवजीभाई पटेल, जेष्ठ सभासद अनिलजी भालेराव, नितीन पाटील, दामुआण्णा नवपुते व इतर मान्यवर यांची उपस्थिती होती.

व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, संचालक शिवाजीराव शेरकर, जयंत अभ्यंकर, अशोक पाटील, डॉ.सौ. मंजुषा कुलकर्णी, सुनील रायठठा, संदीप पंडित, अरविंद धामणे यांसह कार्यक्रमास सर्व संचालक मंडळ व सभासद उपस्थित होते. किशोर शितोळे, संचालक शिवाजीराव शेरकर, जयंत अभ्यंकर, अशोक पाटील, सुनील रायठठठा व सर्व संचालकांनी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

समारोप करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक अनिल भालेराव यांनी देवगिरी बँकेची घोडदौड ही समर्पित, जागरूक अशा सर्व संचालक मंडळ व कर्तव्यनिष्ठ, सेवाभावनेने करणाऱ्या कर्मचारी वर्ग व जागरूक सभासदांमूळे आहे. त्यामुळेच देवगिरी बँकेच्या सर्व सभा या अतिशय कौटुंबिक वातावरणात हसतखेळत पार पाडतात हे वैशिष्ट्य आहे, याचा आदर्श इतर सहकारी संस्थांनी घेण्यासारखा आहे असे म्हणाले.

बँकेचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले, बँकेचे उप.मुख्य. कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे व रुपेंद्र कोयाळकर यांनी मागील सभेचे इतिवृत्तांताचे वाचन केले, तसेच या सभेला व बँकेचे उप.मुख्य कार्यकारी अधिकारी रुपेंद्र कोयाळकर यांनी सभेच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.



# गरुड संकुलाच्या तळघरात वाहन पार्किंग लवकरच !

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील कमलाबाई कन्या शाळेसमोरील गरुड व्यापारी संकुलाच्या बाहेर अनेक वाहन रस्त्यावर उभी असतात. त्यामुळे या ठिकाणी वाहतूकीचे कोंडी निर्माण होत असते तर पार्किंगचा प्रश्नही या ठिकाणी ऐरणीवर आला होता तर या समस्येची दखल घेत आज मनपा आयुक्त देविदास टेकाळे, उपायुक्त संगीता नांदुरकर यांनी अधिकाऱ्यांसह गरुड कॉम्प्लेक्स च्या तळघराच्या जागेची पाहणी केली आहे. दोन दिवसात या जागेत स्वच्छता मोहीम राबवून या ठिकाणी गाळेधारकांना पार्किंगसाठी व्यवस्था करण्यात येईल व ग्राहकांना तळघरासमोर पार्किंगची व्यवस्था केली जाईल अशी माहिती ही प्रसारमाध्यमांशी बोलताना आयुक्त देविदास टेकाळे यांनी दिली आहे.

**महापालिकेच्या आयुक्तांची पाहणी**

पाऊस झाल्यावर गरुड व्यापारी संकुलासमोर पाणी साचते. त्यामुळे या परिसराची मनपा प्रशासनाने पाहणी केली आहे. व्यापारी संकुलाच्या बाहेर असलेल्या गटारीचे पाइप तातडीने बदलण्याची सूचना देण्यात आले असून गरुड कॉम्प्लेक्स ची आवश्यक ठिकाणी दुरुस्ती ही करण्यात येणार आहे. तसेच गरुड कॉम्प्लेक्सच्या आवारात दुकानधारकांनी बोर्ड लावून केलेले अतिक्रमण ही जेसीबीच्या साह्याने मनपा अतिक्रमण निर्मूलन विभागाने काढले आहे.

# भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेचे निकाल जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** आझादी का अमृतमहोत्सव निमित्त भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने दि.२/१/२०२२ रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

माजलगाव येथे या स्पर्धेचे आयोजन संस्कार भारती देवगिरी प्रांताच्या मातृशक्ती प्रमुख श्रीमती स्नेहलताई पाठक यांनी केले होते. यामध्ये ४० कलासाधकांनी सहभाग नोंदवलेला होता. यामध्ये ३ विजेते स्पर्धक देवगिरी प्रांताला मिळाले. यामध्ये सुरेश भगवानराव देशपांडे (माजलगाव) यांना प्रथम क्रमांक प्राप्त झाला. सोबतच त्यांना रोख रक्कम १०,००० चे बक्षीस मिळाले. द्वितीय क्रमांक भारती शैलेश देशपांडे यांना प्राप्त झाला व बक्षिस रोख रक्कम ५००० मिळाले, तसेच अनघा अनिरुद्ध पत्की (अंबाजोगाई) यांना तृतीय क्रमांक व रोख रक्कम ३००० चे बक्षिस प्राप्त झाले.

यात विशेष म्हणजे देवगिरी प्रांतातून लातूर, माजलगाव, अंबाजोगाई, धाराशिव, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, ईत्यादी ठिकाणच्या कलासाधकांचा सहभाग होता. या स्पर्धेचे आयोजन तुळजाभवानी माता मंदिर, सन्मित्र कॉलनी, माजलगाव येथे करण्यात आले होते. या रांगोळी स्पर्धेसाठी




कलासाधकांचा अतिशय उदंड प्रतिसाद मिळाला होता. यावेळी मंदिरातही जागा कमी पडली. या स्पर्धेसाठी प्राणेश पोरे, श्रीराम देशपांडे, सुरेश भानप, डॉ.मार्तंड नवशिंदे, दिगंबर महाजन, किशोर देशमुख, कुणाल कुलकर्णी व मल्हार जवळेकर यांनी विशेष सहकार्य केले होते.

# उद्यापासून मेघ मल्हार व्याख्यानमालेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या वि. वि. चिपळूणकर सभागृहात दि.२०, २१ व २२ जुलै २०२२ रोजी सायंकाळी ४.३० वाजता प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, स्फूर्ती महिला मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिड टाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने मेघ मल्हार व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.




२० जुलै रोजी स्फूर्ती महिला मंडळ तर्फे उप जिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांचे "गोष्टी काही युक्तीच्या" या विषयावर व्याख्यान, २१ जुलै रोजी प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेतर्फे डॉ. संतोष नेवपुरकर यांचे "ज्येष्ठांचे आरोग्य" या विषयावर व्याख्यान आणि २२ जुलै रोजी रोटरी क्लब तर्फे मंगला वैष्णव यांचे व्याख्यान आयोजित केले असून सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# माजलगावच्या नविन मोंढा मार्केटमध्ये स्व.दादासाहेब रांजवण यांच्या नावाने प्रवेशद्वार उभे करा : होके पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** माजलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती, शेतकऱ्यांचे कैवारी स्व. दादासाहेब रांजवण यांच्या नावाने नवीन मोंढा मार्केट यार्डमध्ये प्रवेशद्वार बांधावे असा ठराव घेण्यात यावा, अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस नारायण होके पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या शिष्टमंडळाने सभापती संभाजी शेजुळ यांना निवेदन देऊन केली.

निवेदनात ते पुढे म्हणाले की, स्व.दादासाहेब रांजवण यांनी माजलगाव तालुक्यातील तमाम शेतकरी, व्यापारी, हमाल, मापाडी यांचे हित जोपासत यांच्यासाठी दूरदृष्टीने ठेऊन कसलाही स्वार्थ न साधता कृषी उत्पन्न बाजार समिती या संस्थेकरिता शेकडो एकर जमीन खरेदी करून ठेवली. आज त्याच जागेवर माजलगावची नविन भव्य अशी आडत व्यापार पेठ उभी आहे. त्यामुळे अशा थोर व्यक्तीचे योगदान व निस्वार्थ भावनेने केलेल्या कार्याची दखल घेऊन स्व.दादासाहेब रांजवण या नावाचे भव्य प्रवेशद्वार उभे करून त्यांचा मरणोत्तर सन्मान करावा असे बीड जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस नारायण होके पाटील म्हणाले. यावेळी शेख आहेमद, दत्ता कांबळे, शेख जानुशा, शेख आयास, गणेश चोरमले, शेख तरबेज, श्रीनिवास शेळके हे उपस्थित होते.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी

आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत

पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
~~MRP ₹ 430/-~~ Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
~~MRP ₹ 470/-~~ Offer Price ₹ 375/-
पाने ५३४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
~~MRP ₹ 360/-~~ Offer Price ₹ 280/-
पाने ३६४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकिजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# हिशाम उस्मानी यांच्या राजीनाम्यानंतर काँग्रेस गायब

## गांधीभवनाला टाळे, आंदोलने थांबली

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** शहर जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मोहम्मद हिशाम उस्मानी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. मुस्लिम अल्पसंख्याक समाज व ऐतिहासिक औरंगाबाद शहरावर प्रेम करणारे औरंगाबादकर यांनी उस्मानी यांना डोक्यावर घेतले. शहराच्या नामांतराच्या विरोधात महाविकास आघाडी सरकारमध्ये असताना काँग्रेसच्या मंत्र्यांनी ठरावाला विरोध केला नसल्याने शहराध्यक्ष यांच्यानंतर शेकडो पदाधिकारी व सदस्यांनी राजीनामा दिला.

२१ जूनला महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी नामांतराचा ठराव घेतला. पण महाविकास आघाडी सरकारच्या किमान समान कार्यक्रमात हा विषय नव्हता तरी पण सरकार अल्पमतात असताना ठाकरे यांनी नामांतराचा ठराव मंजूर करुन घेतला. यानंतर शहर व महाराष्ट्रात राजीनामा सत्र औरंगाबाद येथून सुरू झाले. उस्मानाबादचेही नामांतर धाराशिव केल्याने नाराजी पसरली आहे. शिंदे -फडणविस सरकारनेही या निर्णयाला स्थगिती देत पुन्हा एकदा नामांतराचा ठराव घेतला. पण यामध्ये काँग्रेसला धक्का बसला आहे. हिशाम उस्मानी यांनी राजीनामा दिल्यानंतर कार्यकर्त्यांनी गांधीभवनकडे पाठ फिरवली आहे. त्यांनी शहराध्यक्ष असताना सर्व जाती धर्मातील कार्यकर्ते पक्षात जोडले. गांधीभवनचा चेहरामोहरा बदलला. केंद सरकारच्या विरोधात अक्रामकपणे आंदोलने यशस्वी केली. पण त्यांच्या नाराजी राजीनाम्यानंतर गांधीभवनला टाळे लागले आहे. जे कार्यकर्ते कधी गांधीभवनकडे कधीच फिरकले नाहीत ते आता शहराध्यक्ष पदासाठी मुंबई वारी करत आहे.




नामांतरावरुन मुस्लिम अल्पसंख्याक समाज नाराज आहेत त्यासोबत अन्य समाजात पण संभ्रमावस्था आहे. काँग्रेस हायकमांडने राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांना नोटीस बजावत नामांतरावर उत्तर मागितले आहे. बाळासाहेब थोरात व अशोक चव्हाण यांनी तर थेट नामांतराला समर्थन असल्याचे माध्यमांना सांगितले. मग अल्पसंख्याक समाजाकडून मतांची अपेक्षा करु नये असा सूर उमटत आहे. यामुळे आता औरंगाबाद शहरात काँग्रेस व राष्ट्रवादीच्या भुमिकेमुळे एमआयएमचा राजकीय फायदा झाला असल्याचे चित्र आहे. आगामी महापालिका निवडणुकीत मुस्लिम बहुल वार्डात या दोन पक्षांना उमेदवार मिळणार नाही अशी परिस्थिती येवून ठेपली आहे. हिशाम उस्मानी यांनी राजीनामा दिल्याने पक्षाचे मोठे नुकसान झाले असल्याची चर्चा शहरात आहे.

# वैजापूर विधानसभा मतदारसंघाच्या निरीक्षकपदी अविनाश उगले यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** अगदी शालेय जीवनापासून सामाजिक चळवळीमध्ये अग्रेसर असलेला एक सामाजिक कार्यकर्ता महाविद्यालय जीवनापर्यंत व त्यानंतरही काही काळ समाजातील प्रत्येक गरजवंतापर्यंत आपण होऊन पोहोचून त्याच्या कामात स्वतःला चांगल्यापैकी झोकून देत काम करायचा. या अशा चळवळीतील तेवढ्या तरुणावर समता परिषद तथा ओबीसी संबंधित काम करणारे ॲड. सुभाष राऊत यांची नजर पडली आणि त्यांनी क्षणार्धात या तरुणाला आणि तरुणातील कामाच्या छंदाला टिपले आणि समता परिषदेकडे खेचले राजकारणाचा शून्य गंध असलेला हवा तरुण समाजकारणात अग्रेसर ठरला होता तसाच हळूहळू राजकारणात ही सहकाऱ्यांच्या कार्यकर्त्यांच्या आणि वरिष्ठ नेतेगण मंडळींच्या नजरेत भरला पक्षाने छोट्या मोठ्या पदावर नेमणूक करत अविनाश यांना वेळोवेळी काम करण्याची संधी दिली आणि अविनाश यांनीही टाकलेल्या विश्वासाला सार्थ ठरत प्रत्येक वेळी त्या संधीचे सोने केले आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसमध्ये हाच अविनाश नामक तरुण सरचिटणीस पदापर्यंत पोहोचला अशा या अष्टपैलू युवक नेतृत्वास भुजबळांपासून सर्वांनीच विश्वास टाकला विशेषता राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष तथा सर्वेसर्वा असणारे देशाचे नेते शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, छगन भुजबळ, धनंजय मुंडे व युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, कार्याध्यक्ष सुरज चव्हाण, कार्याध्यक्ष रविकांत वरपे यांच्या नेतृत्वाखाली वैजापूर विधानसभा मतदार संघाच्या निरीक्षक पदी निवड करुन आजपर्यंतच्या जबाबदाऱ्यांपैकी अत्यंत महत्वपूर्ण आणि मोठी जबाबदारी देऊन ऐवढ्या कमी वयातही ऐखादा तरुण आपल्या निष्ठेच्या आणि कार्याच्या जिवावर-बळावर कसा पात्र ठरु शकतो. हे अविनाश उगलेंकडे पाहिल्यावर लक्षात येते. राष्ट्रवादी युवक काँग्रेस विधानसभा निरीक्षक यादी जाहीर करण्यात आली आहे...! राज्यातील १०० विधानसभा मतदारसंघात 'सुपर १००' ही संकल्पना राबवत पक्ष मजबुतीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे मग पक्षाचे काम अगदी तळमळीने करणाऱ्या व पवार साहेबांवरती अपार निष्ठा असणाऱ्यांनाच निरीक्षकासारखी महत्वपूर्ण जबाबदारी दिली असल्याचे प्रांताध्यक्ष जयंत पाटील व युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी सांगितले. तेंव्हा अविनाश उगले यांची निवड याच धरतीवर केली आहे. याबाबतीत आमच्या प्रतिनिधीने अविनाश यांना बोलते केले असता यापुर्वीच्या जवाबदारी प्रमाणे ही दिलेली जबाबदारीही मी अगदी तळमळीने व यथायोग्य, योग्य रितीने पार पाडणार असल्याचे उगले यांनी सांगितले. या निवडीबद्दल अविनाश उगले यांचे पक्षातील सर्व स्तरातील कनिष्ठ-वरिष्ठ पदाधिकारी, नेते मंडळींनी अभिनंदन केले.

# "थोडेसे माय बापासाठी" अभियानंतर्गत सर्व रोग निदान आरोग्य शिबिराचे आयोजन



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा ग्रामपंचायतच्या वतीने दि.१९ रोजी कक्ष स्थापन करण्यात आला. सावळदबारा येथील वयोवृद्ध यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून त्यांना त्या कक्षात खुर्च्यावरती बसवून सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान व ग्रामविकास अधिकारी सुधीर भालेराव यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

"थोडेसे माय बापासाठी" या अभियानंतर्गत गावातील वयोवृद्ध जेष्ठ नागरिकांनी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहे, पावसाळ्यात विविध आजार मोठ्या प्रमाणावर पसरत असतात, या करिता सर्व रोग निदान शिबीर ठेवण्यात आले होते. यामध्ये वयोवृद्धासाठी आदी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, धामणगाव बढे द्वारा भव्य डोळे तपासणी शिबीर डॉ. दिपक माळी धामणगाव (बढे) व डॉ. प्रकाश बोंबडे यांच्या नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी करून बीपी, शुगर, ताप, सर्दी, खोकला, मलेरिया अशा विविध आजारावर तपासून गोळ्या व औषधी देण्यात आल्या.

याप्रसंगी प्रा.जीवन कोलते, शातांराम खराटे भाजपा उपध्याक्ष, ग्रा.प.सदस्य मोहन सुरडकर, संजय राजपूत, मा.ग्रा.प. सदस्य फकीराभाऊ तडवी, ईसा तडवी, पत्रकार रहीमखान, योगेश सोळंके, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणिल राजपूत, अमोल राऊळकर, सुभाष मानकर, संजय नप्ते, आदींसह जेष्ठ नागरिक व मान्यवर सर्व रोग निदान शिबिरास उपस्थित होते.

# एरंडवणे जेष्ठ नागरिक संस्थेची कार्यकारिणी घोषित

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एरंडवणे जेष्ठ नागरिक संघाची कार्यकारिणी निवडणूक विजय कुलकर्णी यांच्या देखरेखीखाली नुकतीच पार पडली. संस्थेच्या ४०० सभासदांपैकी १८७ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. ३७ सदस्यांनी २० जागांसाठी नामांकन अर्ज भरले होते. विजयी २० कार्यकारिणी सदस्यामधून ५ पदाधिकारी बिनविरोध निवडून आले. रविवार १७ जुलै रोजी झालेल्या कार्यकारिणी बैठकीत पुढील तीन वर्षासाठीची कार्यकारिणी घोषित केली ती अशी अध्यक्ष -श्रीकांत पुराणिक, कार्याध्यक्ष - अजित गोखले, कार्यवाह- सिमा शेजवळकर, सहकार्यवाह - मुकुंद जोशी, कोष्याध्यक्ष -रामानुज मिणियार यांची निवड करण्यात आली.



**अजित गोखले कार्याध्यक्षपदी श्रीकांत पुराणिक अध्यक्षपदी सीमा शेजवळकर कार्यवाहपदी निवड**

एरंडवणे जेष्ठ नागरिक संस्थेतर्फे दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम, भक्तिभाव संगीत, योगासने, प्राणायाम इ. कार्यक्रमाबरोबरच दर बुधवारी वाचक व्यासपीठ, ज्ञानगंगा वाचनालय, तसेच जेष्ठांसाठी कॅरम, बुद्धिबळ, टेबल टेनिस, ब्रीज स्पर्धा घेतल्या जातात व विविध पारितोषिके दिली जातात. महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. दर मंगळवारी स्मरण रंजन वर्ग घेतले जातात.

नवीन कार्यकारिणीचे अध्यक्ष श्रीकांत पुराणिक यांनी येत्या वर्षात जेष्ठ नागरिकांचे जीवन आनंदी व निरोगी राहण्यासाठी आरोग्य शिबीर, निसर्ग सहल व इतर अनेक उपक्रम घेणार असल्याचे सांगितले. एरंडवणे भागातील अधिकाधिक जेष्ठ नागरिकांनी या संस्थेचे सदस्य होऊन विविध उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहनही या वेळी करण्यात आले.

# पैठण तालुक्यातील सात ग्राम पंचायतींसाठी १५५ नामनिर्देशनपत्र दाखल



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील सात ग्रामपंचायतचा बिगुल वाजला असुन शेवटच्या दिवशी एकुण नामनिर्देशित पत्र दाखल करण्यात आले. सात पैकी दोन ग्रामपंचायत यंदा प्रथमच नवीन ग्रामपंचायतसाठी निवडणूक होत असल्याने नानेगाव, आगरनांदुर येथील ग्रामस्थ आनंदी आहेत. आपेगाव २३, आगरनांदुर २४, नानेगाव १८, खेर्डा २७, शेवता १६, खादगाव २९, तांडा बु.१८ असे एकुण १५५ नामनिर्देशन पत्र उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. यापैकी तालुक्यातील प्रतिष्ठेची होणार असलेली ग्रामपंचायत म्हणजे आपेगाव येथे अत्यंत चुरशीची लढाई होणार असुन प्रस्तापिता विरुद्ध तरूणाई आता ग्रामपंचायतच्या आखाड्यात उतरली असल्याने आपेगाव ग्रामपंचायत निवडणुकीकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)




डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सौंदर्याचा सल्ला





डॉ. उज्ज्वला दहिफळे
(एम.सी.एच.प्लास्टिक सर्जरी)
अ‍ॅस्थॅटिक, लेसर अ‍ॅण्ड प्लास्टिक सर्जन

## कॉस्मेटीक सर्जरी अस्थेटीक सर्जरी

आधुनिक केसरी

**सौदर्य शस्त्रक्रिया :** शरीराचे सौदर्य वाढवून त्याला सुडौल बनवण्यासाठी जी शस्त्रक्रिया केली जाते, त्यास सौदर्यशस्त्रक्रिया म्हणतात. सौदर्यशस्त्रक्रिया ही व्यक्तीमत्व वाढवून सुरेखपणा, सुंदरता व तारुण्य टिकवून ठेवण्यास अत्यंत आवश्यक आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात सुंदर दिसणे याला प्राविण्य दिले जाते. बरेच व्यवसाय व्यक्तीमत्व व सुंदरता यावर आधारित असतात. शस्त्रक्रियेसाठी वयाची मर्यादा नसते. यामध्ये येणाऱ्या बाबींची सविस्तर माहिती खाली दिलेली आहे.

**लायपोसक्शन :** पुरातन काळी लठठपणा आणि वजनदारपणा हे ऐश्वर्य व श्रीमंतीचे लक्षण समजले जायचे, पण सध्याच्या युगात सुडौल व सडपातळ असणाऱ्याला प्राधान्य दिले जाते. ज्यामुळे सुंदर व्यक्तीमत्व व निरोगी शरीर टिकवून ठेवण्यास मदत होते. सौंदर्यासोबत रक्तदाब, मधुमेह, स्थुलपणा इत्यादी आजारसुध्दा वजन कमी केल्यामुळे टाळता येतात. सध्याच्या काळात अनियमीत व स्निग्धनपदार्थाच्या आहारामुळे शरीरात चरबी वाढण्याचे प्रमाण व लठ्ठपणा याचे प्रमाण वाढले आहे. लायपोसक्शनमुळे या बाबीवर उपचार करणे अतिशय सोपे झाले आहे.

**लायपोसक्शन म्हणजे काय ?**

शरीरातील अनावश्यक चरबी काढून शरीर सुडौल बनवणे या पध्दतीस लायपोसक्शन असे म्हणतात. यामध्ये लायपोसक्शन कॅनुला हा लहान इन्सीजन मधून शरीरात टाकून चरबी काढून घेतली जाते. शरीरातील मांडया, नितंब, पोट, दंड, हनुवटी, चेहरा इत्यादी ठिकाणी असलेली चरबी काढता येते. शस्त्रक्रियेनंतर रूग्णाला दोन दिवस रूग्णालयात थांबावे लागते.

**ॲबडॉमीनोप्लास्टी म्हणजे काय ?**

पोटाची चरबी जास्त प्रमाणात वाढल्यामुळे लांबते पोट कमी करण्यासाठी चरबी सोबतजास्त लोंबणारी स्कीन ऑपरेशन करुन काढून टाकावी लागते, यास ॲबडॉमीनो प्लास्टी असे म्हणतात. बाळांतपणानंतर पोटाची स्कीन व स्नायु ढिली पडल्यामुळे, पोटाचा आकार मोठा होतो. या सर्जरीमध्ये चरबी, ढिले पडलेले स्नायू व पोटावरील व्रण स्ट्रेचमार्क या तिन्ही गोष्टीचा उपचार केला जातो. तीन ते चार दिवसानंतर रुग्ण बरा होऊन घरी जातो.

**शस्त्रक्रियेनंतर घ्यावयाची काळजी :** १. प्रेशर बेल्ट वापरणे. २. आवजड काम न करणे आहार संतुलीत ठेवणे. ३. आहार संतुलित ठेवणे. ४. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार वेळोवेळी उपचार करुन घ्यावेत.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9850822648, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com